रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १९ ◆ अंक ४५
www.ramprahar.com
◆ सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## ‘एक देश, एक निवडणूक’साठी तज्ज्ञांचे चर्चासत्र



**मुंबई** : केंद्र सरकारच्या एक देश, एक निवडणूक या संकल्पनेला राज्यात व्यापक जनसमर्थन मिळविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या पुढाकाराने मुंबईत रविवारी (दि.३०) पार पडलेल्या एका चर्चासत्रात विधी, शिक्षण आणि अर्थ क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून या संकल्पनेच्या समर्थनार्थ ठराव मंजूर करण्यात आला. भाजप नेते तथा कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने ॲज्युरिस्ट्स फॉर जस्टिस फाऊंडेशनच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले होते. निवडणुका एकाचवेळी झाल्यास निवडणूक खर्च कमी होण्यासोबतच सरकारी यंत्रणा वारंवार निवडणूक प्रक्रियेत गुंतून राहणार नाही, असे सांगून पोलीस दलावरील अतिरिक्त ताणाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. त्यानंतर ‘एक देश, एक निवडणूक’च्या समर्थनार्थ ठराव मांडून तो एकमताने मंजूर करण्यात आला.

अंतरंग
गोरक्षकांची सुटका ; बजरंग दलाचा जल्लोष/२
पेण उपजिल्हा रुग्णालयात नवजात बाळाचा मृत्यू/५
आगामी वर्ल्डकपसाठी संघबांधणीला वेग/८

# मराठा आंदोलकांशी चर्चेची दारे खुली!

### मुख्यमंत्र्यांनी मांडली भूमिका



**नागपूर : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने चर्चेची दारे खुली ठेवली आहेत. संविधानाच्या चौकटीत आणि कायदेशीर असलेल्या तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन न करणाऱ्या सर्व मागण्यांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. ते रविवारी (दि.३०) नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

सरकारचे प्रतिनिधी आंदोलनस्थळी असून ते आंदोलकांशी चर्चा करीत आहेत. यापूर्वीही सरकारने मार्ग काढला असून पुढेही मार्ग काढला जाईल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुरुवातीपासूनच या विषयावर अत्यंत संवेदनशीलतेने काम करीत आहेत. त्यामुळे चर्चेतून तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न राहणार आहे. ज्या मागण्या कायदेशीर असतील, संविधानाच्या अंतर्गत असतील आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे उल्लंघन करणाऱ्या नसतील, अशा सर्व मागण्यांसाठी आम्ही चर्चेची दारे खुली ठेवली आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

समृद्धी महामार्गावर झालेल्या दरोड्याच्या घटनेची सरकारने गंभीर दखल घेतली आहे. आता जी घटना घडली आहे ती अतिशय गंभीर आहे. याप्रकरणी पोलीस महासंचालकांना सूचना देण्यात आल्या असून विशेष टास्क फोर्स तयार करून कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे मुख्यमंत्री म्हणाले. महामार्गावरील प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या घटनेचा तपास आणि आरोपींवर कारवाईला प्राधान्य दिले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### सहिष्णुता हिंदुत्वाचा आत्मा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सहिष्णुता ही हिंदू संस्कृती आणि विचारांचा मूळ आत्मा असून सर्वांना सोबत घेऊन तसेच सर्व धर्मांचा सन्मान करण्याची शिकवण हिंदुत्वाने दिली आहे. सहिष्णुता म्हणजे अन्याय सहन करणे किंवा मार खाणे नव्हे. कोणी हल्ला करत असेल तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे, मात्र हिंदू समोरून हल्ला करत नाही, तर सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची भूमिका ठेवतो, असेही त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

## शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे नेहमीच तत्पर

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे गौरवोद्गार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षक हे समाजामध्ये सदैव एका आदर्श प्रतिमेचे धनी राहिलेले आहेत. ज्यांच्याकडे बघून समाजाने शिकावे, अशी शिक्षकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे. आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे हे शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच तत्पर असतात. रायगड जिल्ह्यातील शिक्षक हे भाग्यवंत आहेत, ज्यांना ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्यासारखा अभ्यासू लोकप्रतिनिधी मिळाला आहे. खऱ्या अर्थाने आदर्श आमदार पुरस्कार त्यांना देण्यात यावा, अशाच प्रकारचे उत्कृष्ट काम त्यांच्या माध्यमातून होत आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळ्यावेळी केले.

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेच्या वतीने रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यासाठी कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६ शनिवारी (दि.२९) कळंबोली सेक्टर १ येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालयात अत्यंत उत्साहात पार पडला. त्यावेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

**गुणवंत शिक्षकांचा पुरस्काराने सन्मान**

या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या एकूण ८७ गुणवंत शिक्षक, मुख्याध्यापक आणि कर्मचाऱ्यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यांच्यासह आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे व इतर मान्यवरांनी पुरस्कारप्राप्त गुणवंतांचे अभिनंदन करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याच भावनेतून आपण सर्वजण काम करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी बोलताना कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार तथा संघटनेचे संस्थापक ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सांगितले की, समाजाला सोबत घेऊन उज्वल भविष्य घडवणाऱ्या शिक्षकांना शाबासकीची थाप मिळावी तसेच त्यांच्या कार्याला अधिक ऊर्जा आणि प्रेरणा मिळावी या मुख्य उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, नगरसेवक रामदास शेवाळे, अमर पाटील, महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष राजेश पाटील, कोकण विभागाध्यक्ष प्रशांत भामरे, उत्तर रायगड संपर्कप्रमुख संजय भगत, **(पान २ वर..)**

## रेतीबंदर खाडीत बुडून तिघांचा मृत्यू

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यातील रेतीबंदर येथील खाडीत पोहण्यासाठी गेलेल्या तीन जणांचा पाण्यात बडून मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि.३०) दुपारी घडली.



मुंबई-नाशिक महामार्गालगत असलेल्या रेतीबंदर येथे रविवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास तीन जण खाडीत बुडाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाला मिळाली. त्यानंतर कळवा व नारपोली पोलीस ठाण्याचे पथक, अग्निशमन दलाचे जवान, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, टीडीआरएफचे जवान बोटीसह घटनास्थळी दाखल झाले.

शोधमोहीम राबवत खाडीत बुडालेल्या तिघांना सायंकाळी सुमारे ४.२० वाजता बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना रुग्णवाहिकेतून छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा येथे पाठविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

मृतांमध्ये आलम सय्यद (४२), रिझवान सय्यद (४२) आणि साहिल पोलंदास (३०) यांचा समावेश असून तिघेही ठाकूरपाडा, मुंब्रा येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. या घटनेप्रकरणी कळवा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## दोन सख्ख्या भावांचा तानसा नदीत बुडून मृत्यू

**भिवंडी : प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी परिसरातील अकलोली येथे तानसा नदीपात्रात बुडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि.३०) घडली. अरुण चौहान आणि आयुष चौहान अशी मृत भावांची नावे आहेत.

विरार येथील रिक्षाचालक राम बच्चन चौहान हे आपल्या पत्नी, दोन मुले आणि एका लहान मुलीसह रविवारच्या सुट्टीनिमित्त वज्रेश्वरी परिसरात फिरण्यासाठी आले होते. अकलोली येथील गरम पाण्याच्या कुंडावर आंघोळ केल्यानंतर चौहान कुटुंब तानसा नदीपात्राजवळ गेले. त्यावेळी त्यांची दोन मुले बुडाली आणि मृत पावली. त्यामुळे त्यांच्या कुटुंबीयावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## निवडक

### नेपाळ महाप्रलयात मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा ७८८वर

**काठमांडू** : नेपाळमध्ये आलेल्या भीषण महापुरात आतापर्यंत तब्बल ७८८ जणांचे मृतदेह हाती आले आहेत. सर्वाधिक २६४ मृत्यू चितवन भागात झाले असून नवलपरासी ईस्टमध्ये १९४, नवलपरासी वेस्टमध्ये १२०, गोर्खा ५८, नुवाकोट ५२, धाडिंग ५०, तनहुन ३७ आणि रसुवामध्ये १३ जणांना जीव गमवावा लागला आहे. २५०२ नागरिक अद्याप बेपत्ता असून शोध व बचावमोहीम सुरू आहे.

### दहीहंडी सरावादरम्यान सलामी देताना चिमुकला गोविंदा कोसळला

**बदलापूर** : दहीहंडी सरावादरम्यान बदलापूरमध्ये एक धक्कादायक घटना घडली. माखनचोर या दहिकाला उत्सवादरम्यान सातव्या थरावर चढलेला लहानगा गोविंदा सलामी देत असताना खाली कोसळला. सेफ्टी बेल्ट तुटल्याने हा अपघात घडल्याचे समोर आले. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि गोविंदांमध्ये खळबळ उडाली. याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. चिमुकल्या गोविंदाला जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान



**ताश्कंद : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उझबेकिस्तानचा सर्वोच्च राजकीय सन्मान ‘ओली दराजाली दोस्तलिक’ देऊन सन्मानित करण्यात आले. उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव यांनी रविवारी (दि.३०) पंतप्रधान मोदींना या सन्मानाने गौरवले.

या नवीन सन्मानासह आता पंतप्रधान मोदींना जगभरातील विविध देशांकडून मिळालेल्या सर्वोच्च आंतरराष्ट्रीय पुरस्कारांची संख्या आता ३६वर पोहचली आहे. त्यांनी हा सन्मान सर्व भारतीयांना समर्पित केला तसेच हा सन्मान म्हणजे भारताचा हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा आणि देशवासीयांच्या परिश्रमाचा सन्मान असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, ताश्कंदमध्ये पंतप्रधान मोदी आणि उझबेक अध्यक्ष मिर्झियोयेव यांच्यात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ करण्यासंदर्भात भर देण्यात आला. यावेळी व्यापार आणि गुंतवणुकीसंदर्भात चर्चा झाली. सध्याचा एक अब्ज डॉलरचा व्यापार पुढील टप्प्यावर नेण्याचा संकल्प करण्यात आला.

या यशस्वी दौऱ्यानंतर आता पंतप्रधान मोदी किर्गिस्तानची राजधानी असलेल्या बिश्केक येथे पोहचणार आहेत. तेथे ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी शांघाय सहकार्य संघटनेच्या २६व्या शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेत ते सहभागी होतील.

## समृद्धी महामार्गावर आजपासून विशेष वाहतूक ब्लॉक

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर तांत्रिक आणि दुरूस्तीच्या कामांसाठी ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत टप्प्याटप्प्याने विशेष वाहतूक ब्लॉक घेतला जाणार आहे.

आठ दिवसांच्या कालावधीत विशिष्ट तासांसाठी महामार्गावरील ठराविक टप्प्यांवर वाहतूक रोखली जाणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी ऐनवेळी होणारी गैरसोय आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) करण्यात आले आहे.



**पनवेल : येथील महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी अत्यंत उत्साहात साजरा झाला. वाढदिवसानिमित्त महापौरांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले. भेटीदरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांना उदंड व निरोगी आयुष्यासाठी तसेच भावी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशांत पाटील, अनिता पाटील उपस्थित होते.**

## मुंबईत भव्य गणेशमूर्तींसह अचाट संकल्पना

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा लोकप्रिय उत्सव असलेल्या गणेशोत्सवाचे वेध सगळ्यांना लागले आहेत. मुंबईतही या उत्सवाची परंपरा आहे. यंदाच्या गणेशोत्सवात मुंबईतील विविध सार्वजनिक मंडळांनी बाप्पाच्या भव्य मूर्ती आणि अद्भुत संकल्पनांसह जय्यत तयारी केली आहे.



मुंबईतील सर्वात पूजनीय आणि श्रद्धास्थान असलेला चिंचपोकळीचा चिंतामणी आगमनादरम्यान नेहमीच अग्रस्थानी असतो. बाप्पाचे पारंपरिक आणि तितकेच आकर्षक रूप पाहण्यासाठी मिरवणुकीच्या मार्गावर हजारो भक्त बाप्पाची एक झलक पाहायला गर्दी करतात. यंदाही हे चित्र पाहायला मिळाले.

मुंबईच्या उपनगरांमध्ये आपल्या अवाढव्य उंचीमुळे ‘साकीनाक्याचा महाराजा’ यंदा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या मूर्तीचे दर्शन घेण्यासाठीही भाविकांची मोठी गर्दी होणार आहे.

यंदाच्या उत्सवाला एक वेगळा आध्यात्मिक स्पर्श देण्यासाठी ‘परळचा राजा’ वारकरी संप्रदायाच्या वेशभूषेत आणि अवतारात बाप्पाचे दर्शन घडवत आहे. वारकरी परंपरेची भक्ती आणि मुंबईच्या गणेशोत्सवाची भव्यता यांचा हा एक अनोखा संगम आहे.

शिल्पकार अरुण दत्ते यांच्या कल्पकतेतून साकारलेला ‘परळचा महाराजा’ भाविकांना थक्क करण्यास सज्ज आहे. या मूर्तीची रचना आणि त्यामागील इंजिनिअरिंगचा समतोल अत्यंत कमालीचा असून हा यंदाच्या आगमनातील सर्वात कुतूहलाचा विषय ठरला आहे.

यंदाच्या आगमनातील सर्वात अद्भुत शिल्पकला ‘मोर्या मौलाना आझाद रोडचा’ या मंडळाने सादर केली आहे. टिश्यू पेपरपासून बनवलेल्या या मूर्तीत बाप्पा धनुष्यबाण हाती घेतलेल्या श्रीरामाच्या अवतारात आहेत. विशेष म्हणजे एका पर्वतावर एका पायावर उभ्या असलेल्या हनुमानाच्या हाताच्या तळव्यावर बाप्पा उभे असल्याचे हे रामायणकालीन शिल्पकलेचे विहंगम दृश्य थक्क करणारे आहे.

मालवणीचा महाराजा यंदा आगमनामध्ये कृष्णावताराची अनोखी झलक घेऊन आला आहे. घोड्याच्या रथावर आरूढ झालेला हा श्रीकृष्णाच्या रूपातील बाप्पाचा अवतार पौराणिक संकल्पनेवर आधारित असून सर्वांचे मन जिंकत आहे.

मुंबईचा पेशवा या आणखी एका आकर्षक मूर्तीत बाप्पा थेट देवी सरस्वतीच्या वीणेवर तरंगत असल्याचा भास होतो. या अप्रतिम आणि गुंतागुंतीच्या शिल्पकलेमुळे भव्य मूर्तीला हवेत तरंगल्याचा लूक मिळाला असून कारागिरांच्या कौशल्याची पावतीच यातून मिळत आहे.

## रायगड जिल्हा तायक्वांडो चॅम्पियनशिप उत्साहात

### नगरसेवक परेश ठाकूर यांची अध्यक्षपदी निवड




**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वांडो असोसिएशनच्या वतीने पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली २५वी रायगड जिल्हा तायक्वांडो चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धा अत्यंत उत्साहात पार पडली. कळंबोली येथील काळभैरव मंगल कार्यालयात या दोन दिवसीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या चॅम्पियनशिपचे उद्घाटन भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी उपस्थिती दर्शवून खेळाडूंचा उत्साह वाढवला आणि या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे रायगड तायक्वांडो असोसिएशनच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची घोषणा व सत्कार करण्यात आला. अध्यक्षपदी माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर आणि तालुका अध्यक्षपदी महापौर नितीन पाटील यांची निवड करण्यात आली असून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रभाग समिती सभापती मधू पाटील, अजय बहिरा, रवींद्र भगत, नगरसेवक प्रवीण पाटील, दशरथ म्हात्रे, विजय खानावकर, शत्रुघन काकडे, नगरसेविका दमयंती भोईर, तसेच भाजप नेते नरेश ठाकूर, सुभाष पाटील, प्रवीण बेरा, वासुदेव पाटील, अनुराधा पांडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार गोरक्षकांची सुटका; कर्जत न्यायालयाबाहेर बजरंग दलाचा जल्लोष

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोटलवाडी येथील गोवंश कत्तल प्रकरणानंतर कायदा हातात घेतल्याचा आरोप असलेल्या चार गोरक्षकांना रविवारी (दि.३०) कर्जत न्यायालयाने जामीन मंजूर केला. त्यांच्या सुटकेनंतर न्यायालय परिसरात बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करत हार घालून चौघांचे स्वागत केले.

पोटलवाडी येथे गोवंश कत्तल होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर गोरक्षक व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी धडक देत संशयितांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले होते. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून तिसरा आरोपी अद्याप फरार आहे. यावेळी घटनास्थळी झालेल्या गोंधळाचे व्हिडिओ समोर आल्यानंतर कर्जत पोलिसांनी सुमारे २० गोरक्षकां विरोधात गुन्हा दाखल केला. त्यापैकी सुरेश मसणे, नितीन पवाळी, प्रज्ञेश खेडकर आणि तनिष दुर्गे या चौघांना शनिवारी रात्री अटक करण्यात आली. अटकेनंतर कर्जत पोलिस ठाण्याबाहेर बजरंग दलाच्या शेकडो कार्यकर्त्यांनी गर्दी करत आंदोलनाची भूमिका घेतली.

आज सकाळी अ‍ॅड.दीपक गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली वकिलांच्या पथकाने जामिनासाठी युक्तिवाद केला. न्यायालयाने जामीन मंजूर करताच कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. यावेळी अ‍ॅड. गायकवाड यांनी सर्वांना शांतता राखण्याचे व कोणत्याही घोषणा न देता घरी जाण्याचे आवाहन केले.तर जामिनानंतर नितीन पवाळी यांनी, 'धर्माच्या कार्यासाठी अटक स्वीकारली असून त्याचा आम्हाला अभिमान आहे.' अशी प्रतिक्रिया दिली.



## कोल्हारे ग्रामपंचायत भागातील अनेक कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हारे ग्रामपंचायत भागातील अनेक कार्यकर्त्यांनी भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष जयेश जोशी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. यापक्षप्रवेशामुळे कोल्हारे ग्रामपंचायत क्षेत्रात भाजपची ताकद अधिक भक्कम झाली आहे.

पनवेल येथील भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात हा सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी पक्षात प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करताना जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, आपणा सर्वांच्या भाजप प्रवेशामुळे कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये पक्षाच्या पुढील वाटचालीला मोठी चालना मिळेल.पक्षाच्या वाढीसाठी आणि परिसराच्या सर्वसमावेशक विकासासाठी संपूर्ण भारतीयजनता पार्टी तुमच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी या वेळी दिला.

या कार्यक्रमात समाजसेवक अन्वर अली शेख, अनुज कुमार सिंग, मनोज गजाकोश,रघुल कुमार, चंद्रा पवार, किशोर भाई केशवानी, नोमन शेख, शादाब शेख आणिइस्माईल शेख यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या सोहळ्यास भारतीय जनता पार्टीचेमंडल अध्यक्ष नरेश म्हात्रे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश भगत, उपाध्यक्ष रामदास भगत, शक्तीकेंद्रप्रमुख सुरेश भगत, बूथ अध्यक्ष चरणदास भगत आणिअमिताभ भट्टाचार्य यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.



## प्लास्टिक संकलन उपक्रमासाठी रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा गौरव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स खारघर येथील नेचर क्लबतर्फे पर्यावरण संवर्धन आणि कचरा व्यवस्थापनाचा संदेश देत जुलै महिन्यात विशेष प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्यात आली होती .

सदर उपक्रमास बहुसंख्य विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा संकलित केला होता.

सदर संकलित करण्यात आलेला प्लास्टिक कचरा योग्य पुनर्वापर व कचरा व्यवस्थापनासाठी २५ जुलै २०२६ रोजी प्रोजेक्ट मुंबईच्या प्रतिनिधींकडे सुपूर्द करण्यात आला.




महाविद्यालयाने पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत प्रोजेक्ट मुंबईतर्फे २४ ऑगस्ट २०२६ रोजी महाविद्यालयाला एक बसण्यासाठी बाक (बेंच) आणि कचरापेटी भेट देऊन गौरविण्यात आले. प्लास्टिक संकलन मोहिमेत महाविद्यालयाने दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने ही भेट देण्यात आली. सदर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होण्यासोबतच प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि पुनर्वापराचे महत्त्व अधोरेखित झाले.

महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्नांची दखल घेत प्रोजेक्ट मुंबईने केलेला हा सन्मान महाविद्यालयाच्या पर्यावरणपूरक उपक्रमांना निश्चितच प्रोत्साहन देणारा ठरला.

## मोकाट गुरांचा पाली-खोपोली महामार्गावर कब्जा!

### जनावरे रस्त्यावर सोडणाऱ्या मालकांवर गुन्हे दाखल करा; वाहनचालकांची मागणी

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली-खोपोली महामार्गावरील रासळ आणि कानसळ परिसरात मोकाट गुरांनी अक्षरशः महामार्गावर कब्जा केला आहे. रस्त्याच्या मधोमध कळपच्या कळप ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

विशेषतः रात्रीच्या वेळी अचानक वाहनांसमोर येणाऱ्या गुरांमुळे गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

वाहनांचे हॉर्न वाजवूनही गुरे रस्ता सोडत नसल्याचे चित्र अनेकदा पाहायला मिळत आहे.



त्यामुळे वाहनचालकांना वाहने थांबवून खाली उतरून गुरांना रस्त्याच्या बाजूला हाकलावे लागत आहे. काही ठिकाणी तर रस्त्याच्या मध्यभागी गुरांच्या झुंजी सुरू असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

मोकाट गुरांमुळे वाहनांचे नुकसान आणि अपघाताचा धोका वाढत असताना नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. उद्या याच गुरांमुळे एखाद्या दुचाकीस्वाराचा किंवा प्रवाशाचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा सवाल वाहनचालक आणि नागरिक उपस्थित करीत आहेत.

गुरांना महामार्गावर मोकाट सोडणारे मालक कुठे असतात? गुरांची जबाबदारी घेण्यासाठी ते पुढे का येत नाहीत? गुरे मोकाट सोडायची आणि अपघात झाला की वाहनचालकालाच दोषी ठरवायचे, हा कोणता न्याय? असा संतप्त सवालही वाहनचालकांकडून केला जात आहे.

महामार्गावर मोकाट गुरे सोडणाऱ्या पशुमालकांची ओळख पटवून नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे. मोकाट गुरांमुळे अपघात झाल्यास संबंधित पशुमालकाची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कायदेशीर तरतुदींनुसार कारवाई करण्याची मागणीही पुढे आली आहे.

पाली-खोपोली महामार्गावरील रासळ-कानसळ परिसरात मोकाट गुरांचा तातडीने बंदोबस्त करून संबंधित पशुमालकांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी वाहनचालक व नागरिकांतून होत आहे.

## बालकांच्या संविधानिक हक्कांवरील ‘कलरिंग बुक’चे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

न्याय संस्था आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यावतीने बालकांना त्यांच्या संविधानिक हक्कांची माहिती सहज, आनंददायी पद्धतीने मिळावी, यासाठी 'प्रत्येक बालकाने जाणून घ्यावेत असे १८ मूलभूत हक्क' हे बुक तयार करण्यात आले आहे. या कलरिंग बुकचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.



नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डंगरे, माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, अनिशा गोपी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राज्यात संविधान फेलोशिपचाही शुभारंभ करण्यात आला.

बालकांच्या हक्कांची माहिती त्यांना लहान वयापासूनच व्हावी, या उद्देशाने तयार करण्यात आलेले हे कलरिंग बुक मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बुकमध्ये निवारा, पोषण, शिक्षण आणि मोफत कायदेशीर मदत यांसह बालकांच्या १८ महत्त्वपूर्ण हक्कांची माहिती देण्यात आली आहे. तसेच बालविवाह, बालमजुरी, रॅगिंग, बुलिंग आणि लैंगिक शोषण या विषयांचाही बालकांना समजेल अशा संवेदनशील पद्धतीने समावेश करण्यात आला आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. या प्रयत्नांना कल्पकतेतून बळ देणाऱ्या या कलरिंग बुकच्या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्कांची माहिती सहज आणि आनंददायी पद्धतीने मिळणार आहे. रंग भरताना बालकांच्या मनावर त्यांच्या हक्कांची जाणीव रुजण्यास मदत होणार असल्याचा आनंद आहे. तसेच संविधान फेलोशिपच्या माध्यमातून कायदे आणि संविधानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संस्थेने घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे.कार्यक्रमा दरम्यान धारावी ड्रीम प्रोजेक्ट यांच्यावतीने सादरीकरण करण्यात आले.

## फळांच्या दरांत वाढ; आवक घटल्याचा परिणाम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) फळ बाजारात आवक घटल्याने काही प्रमुख फळांच्या दरात वाढ झाली आहे. पावसाळी वातावरणाचा फळबागांवरील परिणाम, हंगामानुसार उत्पादनातील चढ-उतार आणि काही भागांतून मालाची काढणी व वाहतुकीवर झालेला परिणाम यामुळे आवक कमी झाल्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यातच श्रावण महिन्यातील उपवास आणि सणासुदीच्या काळात फळांना असलेली मागणी कायम असल्याने दरावर परिणाम झाला आहे.

फळांची आवक घटण्यामागे पावसाळ्यातील हवामानाचा फळबागांवर होणारा परिणाम, फळगळ, कीड-रोग तसेच हंगामानुसार उत्पादनातील बदल ही कारणे असू शकतात. पावसामुळे काही ठिकाणी काढणी आणि वाहतुकीवरही परिणाम होतो. मात्र, प्रत्येक फळाच्या आवकेत झालेल्या घटीमागे एकच कारण नसून उत्पादक भागानुसार परिस्थिती बदलत असल्याचे मत फळ व्यापाऱ्यांनी व्यक्त केले. घाऊक बाजारात दरवाढ झाल्याने किरकोळ बाजारातही दरवाढीची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, आवक घटली असली तरी सर्वच फळांचे दर वाढलेले नाहीत. डाळिंबाची आवक १,५८९ वरून ७९५ क्विंटलवर आली असली तरी त्याचा सरासरी दर १३५ रुपयांवरून १३० रुपये प्रतिकिलो झाला. अननसाची आवक ८०० वरून ३०० क्विंटल झाली; मात्र त्याचा सरासरी दर ५५ रुपये प्रतिकिलोवर स्थिर राहिला. यावरून केवळ आवक घटणे नव्हे, तर मागणी आणि उपलब्ध पुरवठ्याचाही दरांवर परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले.

सणासुदीत दर चढेच राहण्याची शक्यताआगामी गणेशोत्सव आणि त्यानंतरचा नवरात्रोत्सव लक्षात घेता फळांना मागणी वाढण्याची शक्यता आहे. सध्या काही प्रमुख फळांची आवक घटलेली असताना सणासुदीच्या काळात मागणी वाढल्यास पुरवठ्यावर आणखी ताण येऊ शकतो. त्यामुळे संत्री, पेरू, मोसंबी यांसह काही फळांचे दर पुढील काळातही चढेच राहण्याची शक्यता फळ बाजारातील व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

पान १ वरुन

## शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे नेहमीच तत्पर

पालघर संपर्कप्रमुख विठ्ठल गोरे, सुधागड शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पालवे, सल्लागार रमेश जाधव, दवणे, एल. आर. पाटील, विलास जाधव, उत्तर रायगड विभागाध्यक्ष दिलीप म्हासे, सचिव विनोद डाकी, प्राथमिक विभाग प्रमुख निर्भय म्हात्रे, सल्लागार तथा भाजप सेलचे अध्यक्ष हिरामण कोकाटे, रघवे, दीपक मोकल, जिल्हा महिला आघाडी प्रमुख साधना मालकर, सदस्य पंढरीनाथ म्हस्कर, भाऊ हरड यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, जिल्ह्यातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सोहळा यशस्वी करण्यासाठी शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष दिलीप म्हसे, सचिव विनोद डाकी आणि संपर्क प्रमुख संजय भगत यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा सोहळा व नारीशक्तीचा जागर -महापौर सुजाता पाटील

**नवी मुंबई : बातमीदार**

एकटी व्यक्ती आनंदी होऊ शकते मात्र एकजुटीने आनंदासोबतच परिवर्तन घडू शकते असे सांगत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी मंगळागौर स्पर्धा हे एकत्र येण्याचे माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. मंगळागौर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सोहळा आहे, या माध्यमातून नारीशक्तीचा जागर होतो असे सांगत या स्पर्धेत सहभागी होणा-या महिला या संस्कृती जोपसाणा-या दूत आहेत अशा शब्दात महापौर महोदयांनी गौरव केला. नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित महिला मेळाव्यानिमित्त त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबवित नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे सांगून महापौर महोदयांनी आता एनएमएमटी बसेसमध्ये चालकही महिलाच असतील असे सांगितले. त्यादृष्टीने महिलांना चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारी योजना महासभेत मंजूर केली असल्याचे सांगून मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील एकल महिलांसाठीच्या योजनांकरिताही नोंदणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महापौर सुजाता पाटील यांचेसमवेत बेलापूर विधानसभा सदस्य आमदार मंदा म्हात्रे, सभागृह नेते सागर नाईक, महिला व बालकल्याण समिती सभापती सलुजा सुतार, फ प्रभाग समिती सभापती ललिता मढवी, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, नगरसेवक जयवंत सुतार, नगरसेविका अंजनी भोईर, स्वाती गुरखे, शशिकला पाटील, दयावती शेवाळे, अ‍ॅड. भारती पाटील, मिरा पाटील, संतोषी म्हात्रे, अंजना म्हात्रे, प्रिती भगत, शिल्पा ठाकूर, श्रेया जिरगे, मिनाक्षी पाटील, वैष्णवी नाईक, माधुरी सुतार, अंजली वाळुंज, प्रतिक्षा पाटील, रेश्मा मढवी उपस्थित होते.

महिला मेळाव्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मंगळागौर स्पर्धेची अंतिम फेरी सुरूवातीला झाली. यामध्ये रूचिरा ग्रूप ऐरोली यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच नारीशक्ती मंगळागौर समुह नेरूळ यांनी व्दितीय आणि वाशीचा राजा महिला बचत गट वाशी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. आदिशक्ती ग्रूप ऐरोली आणि नुतन एकता महिला मंडळ बेलापूर या महिला समुहांना उत्तेजनार्थ पारितोषिकाने सन्मानीत करण्यात आले. अंतिम फेरीत स्थान मिळविलेल्या राधेश्याम महिला मंडळ तुर्भे, धनलक्ष्मी महिला मंडळ कोपरखैरणे, संस्कृतीची शान समुह घणसोली, नव्या फाऊंडेशन घणसोली व नृत्य इल्यूजन डान्स स्टुडिओ नेरूळ या पाच नृत्यसमुहांना उल्लेखनीय सादरीकरणाबद्दल सन्मानित करण्यात आले.



# महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

**पनवेल** : येथील महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस शनिवारी (दि. २९) विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. महापौरांनी पुष्पगुच्छ व भेटवस्तूंऐवजी गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या देण्याच्या केलेल्या आवाहनाला नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद देत १० हजारांहून अधिक वह्या जमा केल्या. वाढदिवसाचे औचित्य साधून शहरातील विविध प्रभागांत शालेय साहित्य वाटप, स्कूल बॅग वाटप, गुणवंतांचा गौरव, रस्ते काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन आणि लाभार्थ्यांना कार्ड वाटप असे उपक्रम राबविण्यात आले.

## नौपाड्यात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून शनिवारी (दि. २९) अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून नौपाडा येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी शालेय वस्तू वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नगरसेवक प्रदीप भगत यांच्या विशेष पुढाकारातून व आयोजनातून हा सामाजिक उपक्रम पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात



आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी वाढदिसावनिमित्त शैक्षणिक उपक्रम राबवल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रमाला प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, रवींद्र जोशी, नगरसेवक विकास घरत, दशरथ म्हात्रे, भाजप नेते राजेश गायकर यांच्यासह नागरिक व शिक्षक उपस्थित होते.

## महापौरांच्या आवाहनाला प्रतिसाद देत १० हजारांहून अधिक वह्या जमा

**पनवेल** : येथील महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून शनिवारी अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसाचे औचित्य साधून महापौर नितीन पाटील यांनी सत्कार करण्यासाठी पुष्पगुच्छ किंवा महागड्या भेटवस्तू न आणता गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी मदत म्हणून वह्या आणण्याचे आवाहन केले होते.

महापौरांच्या या अत्यंत स्तुत्य आणि सामाजिक भान जपणाऱ्या आवाहनाला नागरिकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे. या आवाहनानुसार वाढदिवसाच्या निमित्ताने तब्बल १० हजारांहून अधिक वह्या जमा झाल्या आहेत. वाढदिवसानिमित्त नागरिकांनी दाखवलेले हे प्रेम व शिक्षणाप्रति व्यक्त केलेले सामाजिक उत्तरदायित्व पाहून महापौर नितीन पाटील यांनी आनंद व्यक्त करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावणाऱ्या सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## कळंबोलीत जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग वाटप

**पनवेल** : येथील महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपत शनिवारी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याअंतर्गत कळंबोली गावातील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग वाटप करण्याचा स्तुत्य उपक्रम पार पडला.

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक विजय खानावकर यांच्या विशेष पुढाकाराने व आयोजनातून हा उपक्रम संपन्न झाला. कार्यक्रमात महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला मदत व्हावी व त्यांना शिक्षणासाठी अधिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने



उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांच्या हस्ते नवीन स्कूल बॅग मिळताच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

यावेळी प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक दशरथ म्हात्रे, नगरसेविका दमयंती भोईर यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, शिक्षक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रभाग १४मध्ये रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन, कार्ड वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शनिवारी विविध सामाजिक व विकास उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या अंतर्गत प्रभाग क्रमांक १४मध्ये भाजप जिल्हा उगमनगर आणि परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट कॉक्रीटीकरणाचे भूमिपूजन तसेच ज्येष्ठ नागरिक व पात्र लाभार्थ्यांना एनसीएमसी कार्ड आणि आयुष्मान भारत योजना कार्डचे वाटप महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

हा कार्यक्रम भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना महापौर नितीन पाटील यांनी सांगितले की, निवडणुकीच्या काळात झालेल्या गोष्टी विसरून पक्षाचे काम आणि प्रभागाचा विकास पुढे नेण्यासाठी सर्व




कार्यकर्ते ज्या तळमळीने एकत्र आले आहेत ते खरोखरंच वाखाणण्याजोगे आहे. यासोबतच प्रभागात अशा उपयुक्त कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल त्यांनी मयुरेश नेतकर यांचे विशेष आभार मानले.

कार्यक्रमाला प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी उपनगराध्यक्षा जैनब शेख, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, भाजप ओबीसी सेलचे सतीश पाटील, रेणुका नेतकर, पनवेल शहर सरचिटणीस रूपेश नागवेकर, भाजप नेते शैलेश म्हात्रे, प्रभाग क्रमांक १४चे अध्यक्ष कृणाल पाटील, शहर युवा मोर्चा उपाध्यक्ष शुभम कांबळे, प्रभाग उपाध्यक्ष रोहित आठवणे, विभागप्रमुख तुषार कापरे, विनय शहा, शितल म्हात्रे, तृप्ती आठवणे, अनुराधा शहा, वर्षा दळवी, पूनम नेतकर यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुणवंत कामगारांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिक कार्यामुळेच आपण सत्तेत आहोत आणि त्यांच्या कल्याणासाठीच ही सत्ता वापरता आली पाहिजे, या भावनेतून आम्ही सर्वजण अविरत काम करीत आहोत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभीष्टचिंतन आणि कामगारांच्या सत्कार सोहळ्यावेळी केले.




पनवेल म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियन, पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयोजनातून पनवेल महानगरपालिकेचे महापौर तथा युनियनचे सल्लागार नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अभीष्टचिंतन सोहळा व गुणवंत कामगार सन्मान सोहळा शनिवारी (दि. २९) पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडला.

कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी आणि महापौर नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी महापौर नितीन पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल युनियनचे आभार मानले तसेच युनियनच्या वतीने मांडण्यात आलेल्या मागण्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत कामगारांची अपेक्षित कामे लवकरात लवकर मार्गी लावली जातील, असे आश्वासन दिले. हा सोहळा म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी पनवेल महानगरपालिकेत उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या गुणवंत कामगारांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव व सन्मान करण्यात आला. तसेच वाढदिवसानिमित्त महापौर नितीन पाटील यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले.

कार्यक्रमाला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंझारराव, दशरथ म्हात्रे, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, कार्याध्यक्ष संतोष पवार, कोषाध्यक्ष दत्तगुरु म्हात्रे आणि कार्यालय प्रमुख महेंद्र गायकवाड यांच्यासह विविध पदाधिकारी, पालिका अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महापौरांच्या वाढदिवसानिमित्त ५०० वृक्षांचे दान; नगरसेविका प्रीती जॉर्ज-म्हात्रे यांचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल** : येथील महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका प्रीती जॉर्ज–म्हात्रे यांनी पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबविला. वाढदिवसाच्या पारंपरिक शुभेच्छांऐवजी सामाजिक बांधिलकी जपत 'प्रोटेक्ट ट्री फॉर ग्रीन इंडिया फाउंडेशन'च्या माध्यमातून ५०० वृक्षांचे दान करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रीती जॉर्ज यांनी महापौर नितीन पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. महापौरांनी नेहमीच महिला शक्तीला प्राधान्य दिले आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी विविध योजना व उपक्रमांना त्यांनी मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून मी त्यांची ऋणी आहे, असे त्यांनी सांगितले. महापौरांनी वाढदिवसानिमित्त बुके किंवा केक देण्याऐवजी पुस्तके अथवा समाजोपयोगी वस्तू भेट देण्याचा संदेश दिला आहे. त्याच विचारातून हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आल्याचे नगरसेविका जॉर्ज यांनी स्पष्ट केले.

'प्रोटेक्ट ट्री फॉर ग्रीन इंडिया फाउंडेशन'चे ओंकार देशमुख यांच्या सहकार्याने आदई डोंगरावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी ५०० झाडे दान करण्यात आली. ही संस्था उन्हाळ्यातही कावडीच्या माध्यमातून पाणी वाहून नेत डोंगरावरील झाडांचे संगोपन करते. पर्यावरण संवर्धन प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. आज लावलेले झाड उद्याच्या पिढीसाठी मोठी संपत्ती ठरेल, असा विश्वास नगरसेविका प्रीती जॉर्ज यांनी व्यक्त केला.



## शिवसेनेकडून गरजू विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**पनवेल** : शिवसेनेतर्फे पनवेलचे महापौर नितीन पाटील यांचा वाढदिवस पनवेल शहर शिवसेना शाखेत अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महापौरांच्या आवाहनाला पाठिंबा देत शिवसेनेतर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटप करण्यात आले. कंपनी सेक्रेटरी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केल्याबद्दल पनवेलचा सुपुत्र विश्वेश सहस्रबुद्धेचा गौरव महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सल्लागार रमेश गुडेकर, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण, एकनाथ म्हात्रे, गणेश म्हात्रे, महिला तालुकाप्रमुख मंदा जंगले, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, समन्वयक राहुल गोगटे, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, पनवेल शहर संघटक अभिजित साखरे, पदाधिकारी, कार्यकर्ते व इतर मान्यवर उपस्थित होते.



## पनवेल रेल्वे स्टेशन येथे 'रोटरी'तर्फे रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशन येथे के. इ. एम. हॉस्पिटल ब्लड बँक आणि रोटरी डिस्ट्रिक्ट३१३१ तसेच इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३१३ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबिर अत्यंत उत्साहात पार पडले रक्तदान करा,जीवन वाचवा या सामाजिक संदेशासह शनिवारी या शिबिराचे आयोजन करण्यातआले होते.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले. या प्रसंगी विधानसभेचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिबिराला भेट देऊन या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करणाऱ्या सर्व आयोजकांचेअभिनंदन केले, तसेच स्वत...हून पुढे येऊन रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्याचे मनापासून आभार मानले.




या कार्यक्रमाला प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक मनोज भुजबळ,दशरथ म्हात्रे, नगरसेविका दर्शना भोईर, प्रीती जॉर्ज, रोटरी क्लब ऑफ पनवेलचे पीडीजी रोटेरियन डॉ. शैलेश पालेकर, इनर व्हील क्लब ऑफ पनवेलच्या रोटेरियन डॉ. शोभना पालेकर, इंडस्ट्रियल टाऊनच्या अध्यक्षा डॉ. जयश्री पाटील, इनरव्हीलच्या अध्यक्षा अमृता नाईक, रोटेरियन संजीवनी मालवणकर यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुंडे विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे शाखेत हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांचा १२१वा जन्मदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

प्रारंभी विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी. बी. साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस. डी. थोरात, पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, क्रीडा विभागप्रमुख प्रा. केशव पवार, उपशिक्षक डी. डी. पाटील व सर्व सेवकवृंद यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक साळुंखे यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनाची माहिती सांगत मेजर ध्यानचंद यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान, शिस्त, मेहनत, संघभावना, नेतृत्वगुण, चिकाटी, आत्मविश्वास आणि देशप्रेम याबद्दल माहिती देण्यात आली. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यालयात खो–खो, कबड्डी, धावणे, बॉल पास चॅलेंज अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

कार्यक्रमाचे नियोजन ज्युनिअर कॉलेजचे क्रीडा विभागप्रमुख प्रा. केशव पवार व माध्यमिकचे क्रीडा विभागप्रमुख उपशिक्षक डी. डी. पाटील यांनी केले. सर्व खेळांचे धावते समालोचन विद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन. पाटील यांनी केले.

## संपादकीय

# भारताची वाढती प्रतिष्ठा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परराष्ट्र धोरणाला मिळणारे सातत्यपूर्ण यश आणि जगभरात भारताची वाढत चाललेली प्रतिष्ठा ही बदलत्या जागतिक समीकरणांची ठळक बाब ठरत आहे. ताश्कंदमध्ये मिळालेला उझबेकिस्तानचा सर्वोच्च सन्मान हा केवळ पंतप्रधान मोदींचा गौरव नसून भारताच्या वाढत्या प्रभावाची आणि सामर्थ्याची जागतिक पातळीवरील पोचपावती आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यांकडे केवळ औपचारिक राजनैतिक भेटी म्हणून पाहता येणार नाही. प्रत्येक दौऱ्यामागे भारताचे आर्थिक हित, राष्ट्रीय सुरक्षा, ऊर्जा गरजा, तंत्रज्ञान, व्यापार, गुंतवणूक आणि सामरिक भागीदारी यांचा व्यापक विचार असल्याचे गेल्या काही वर्षांत दिसून आले आहे. त्यामुळेच भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवी दिशा मिळाली असून जागतिक व्यासपीठावर भारताचा आवाज अधिक ठामपणे ऐकू येऊ लागला आहे. उझबेकिस्तान दौऱ्यात याचीच पुन्हा प्रचिती आली. ताश्कंदमध्ये उझबेकिस्तानचे अध्यक्ष शावकत मिर्झियोयेव यांनी पंतप्रधान मोदी यांना देशाचा सर्वोच्च सन्मान प्रदान केला. हा सन्मान मोदी यांनी सर्व भारतीयांना समर्पित केला. भारताचा हजारो वर्षांचा सांस्कृतिक वारसा आणि देशवासीयांच्या परिश्रमांचा हा गौरव असल्याचे त्यांनी नमूद केले. या नव्या सन्मानासह पंतप्रधान मोदी यांना जगभरातील विविध देशांकडून मिळालेल्या सर्वोच्च आंतरराष्ट्रीय सन्मानांची संख्या ३६वर पोहचली आहे. ही बाब निश्चितच अभिमानाची असली, तरी या पुरस्कारांकडे केवळ व्यक्तीचा गौरव म्हणून न पाहता भारताच्या वाढत्या जागतिक प्रतिष्ठेचे प्रतीक म्हणून पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. ताश्कंदमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत भारत आणि उझबेकिस्तानमधील संबंध अधिक दृढ करण्यावर भर देण्यात आला. व्यापार आणि गुंतवणुकीपासून संरक्षण, ऊर्जा, डिजिटल कनेक्टिव्हिटी, महत्त्वपूर्ण खनिजे, शिक्षण, आरोग्य आणि कृषी अशा विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढविण्याचा निर्धार करण्यात आला. सध्या सुमारे एक अब्ज डॉलर असलेला द्विपक्षीय व्यापार पुढील टप्प्यावर नेण्याचे उद्दिष्टही निश्चित करण्यात आले. यावरून पंतप्रधान मोदींच्या परराष्ट्र धोरणातील एक महत्त्वाचा पैलू स्पष्ट होतो तो म्हणजे मैत्रीचे रूपांतर भागीदारीत आणि भागीदारीचे रूपांतर विकासाच्या संधींमध्ये करणे. आजच्या काळात ऊर्जा आणि महत्त्वपूर्ण खनिजांचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. इलेक्ट्रिक वाहने, सेमीकंडक्टर, संरक्षण तंत्रज्ञान आणि आधुनिक उद्योगांसाठी आवश्यक असलेल्या क्रिटिकल मिनरल्सच्या उपलब्धतेसाठी भारताला विश्वासार्ह भागीदारांची गरज आहे. त्यामुळे मध्य आशियातील देशांशी वाढणारे संबंध भारताच्या आर्थिक आणि सामरिक हितासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत. ऊर्जा सुरक्षा, खनिज उपलब्धता आणि नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश यामुळे भविष्यात भारतीय उद्योग आणि अर्थव्यवस्थेला मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. पीएम मोदींच्या परदेश दौऱ्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विविध शक्तिकेंद्रांशी संबंध ठेवताना भारताचे सामरिक स्वातंत्र्य जपण्याचा प्रयत्न. अमेरिका, रशिया, युरोप, आखाती देश, आफ्रिका आणि मध्य आशियातील राष्ट्रांशी भारत एकाच वेळी संवाद आणि सहकार्य वाढवत आहे. बदलत्या जागतिक राजकारणात ही संतुलित भूमिका भारताला स्वतःच्या राष्ट्रीय हितानुसार निर्णय घेण्याची अधिक मोकळीक देते. उझबेकिस्ताननंतर पंतप्रधान मोदी किर्गिस्तानची राजधानी बिश्केक येथे शांघाय सहकार्य संघटनेच्या २६व्या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. सुरक्षा, प्रादेशिक कनेक्टिव्हिटी, दहशतवादविरोधी लढा आणि प्रादेशिक स्थैर्य यांसारखे विषय भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा बहुपक्षीय व्यासपीठांवर भारताची भूमिका प्रभावीपणे मांडणे आणि इतर देशांशी सहकार्य वाढविणे हे आजच्या जागतिक परिस्थितीत आवश्यकच आहे.**

# तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांच्या उपचारांना गती



गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून ॲनिमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

तीव्र रक्तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. एचएमआयएस अहवालानुसार चालू वर्षात (२०२६–२७ जुलैअखेर) नोंद झालेल्या एकूण मातांपैकी तपासणीअंती २३५२४ गरोदर मातांची तीव्र रक्तक्षय असलेल्या अतिजोखमीच्या माता म्हणून निदान झाले आहे. त्यापैकी २१३३७ मातांना आयर्न सुक्रोज किंवा फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) द्वारे उपचार देण्यात आले असून उपचाराचे प्रमाण ९१ टक्क्यांवर पोहोचले आहे.

गरोदरपणातील तीव्र रक्तक्षयामुळे माता आणि गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे या समस्येचे वेळीच निदान करून उपचार देणे, उच्च जोखमीच्या मातांचा सातत्याने पाठपुरावा करणे आणि उपचारानंतर पुनर्तपासणी करणे यावर राज्य शासनाने विशेष भर दिला आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमार्फत ‘तपासणी–निदान–उपचार–पुनर्तपासणी’ही साखळी अधिक परिणामकारक करण्यासाठी (Four T Strategy Test, Talk, Treat, Track) नियोजनबद्ध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या ‘ॲनिमिया मुक्त भारत अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१८–१९ पासून प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्यावरील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना आयर्न सुक्रोज इंजेक्शनद्वारे उपचार देण्यात येत होते. सन २०२४–२५ पासून राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आयर्न सुक्रोजसोबत, अधिक प्रभावी असलेले इंजेक्शन फेरीक कार्बोक्सी माल्टोजही उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे उपचारांचे पर्याय वाढले असून पात्र मातांना गरजेनुसार जलद व प्रभावी सेवा देणे शक्य झाले आहे.

उपचार पद्धतीचा प्रभावी आणि सुरक्षित वापर व्हावा, यासाठी जानेवारी २०२६ मध्ये राज्यस्तरावर वैद्यकीय अधिकारी व संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांचे ऑनलाइन प्रशिक्षण घेण्यात आले. तसेच औषधांचा पुरेसा साठा, वेळेत संदर्भ सेवा आणि उच्च जोखमीच्या गरोदर मातांची स्वतंत्र नोंद ठेवून उपचार पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करण्याचे आरोग्य विभागांकडून नियोजन करण्यात आले आहे.

या वर्षात जिल्हानिहाय कामगिरीत अनेक जिल्ह्यांनी उल्लेखनीय प्रगती नोंदविली आहे. अहिल्यानगर, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, रत्नागिरी, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यात १०० टक्के तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देण्यात आले आहेत. नागपूर, सिंधूदूर्ग, गोंदिया, छत्रपती संभाजीनगर, पुणे, हिंगोली, जालना, धाराशिव व ठाणे या जिल्ह्यांनी ९५ ते १०० टयांपर्यंत तीव्र रक्तक्षयाच्या मातांना उपचार देऊन साध्य पूर्ण केले आहे. ही कामगिरी राज्यातील मातृ आरोग्य यंत्रणेची तत्परता आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागामुळे शक्य होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातही उपचार सेवा प्रभावीपणे पोहोचत आहे. लातूर, नाशिक, भिवंडी, कोल्हापूर, उल्हासनगर, नांदेड–वाघाळा, नवी मुंबई, सोलापूर, चंद्रपूर, परभणी व सांगली–मिरज कुपवाड या क्षेत्रांमध्ये उपचारांचे प्रमाण १०० टक्के आहे. इतर सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये पात्र मातांपर्यंत उपचार वेळेत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र पाठपुरावा करण्यात येत आहे. उपचारांचे प्रमाण तुलनेने कमी असलेल्या नंदुरबार, सोलापूर, गडचिरोली, पालघर, नाशिक आणि भंडारा या जिल्ह्यांसाठी विशेष कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. या भागांमध्ये जिल्हानिहाय उद्दिष्टे निश्चित करून आशासेविका, आरोग्यसेविका, वैद्यकीय अधिकारी आणि जिल्हा आरोग्य यंत्रणेमार्फत उपचार कव्हरेज वाढविण्यावर भर दिला जात आहे. शिवाय सार्वजनिक आरोग्य विभागाने तीव्र रक्तक्षय असलेल्या सर्व गर्भवती महिलांना त्यांच्या हिमोग्लोबिनची पातळी वाढविण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली आयर्न सुक्रोज/फेरिक कार्बोक्सि माल्टोज इंजेक्शन देण्यासाठी जानेवारी २०२६ ते मार्च २०२६ अखेर विशेष मोहीम राबविली आहे. गरोदर मातांवर रक्तक्षयाचे उपचार नेहमी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीच करावी लागतात.

गर्भधारणेची नोंद होताच प्रत्येक महिलेची हिमोग्लोबिन तपासणी, आयर्न–फॉलिक ॲसिडच्या नियमित सेवनाबाबत समुपदेशन, पोषक व लोहयुक्त आहाराची माहिती आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञांकडे संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. एचएमआयएस अहवालाच्या माध्यमातून जिल्हा व तालुकानिहाय तपासणी, निदान आणि उपचाराच्या प्रगतीचे नियमित विश्लेषण केले जात आहे.

रक्तातील हिमोग्लोबिन आणि शरीरातील लोहाचा साठा वेगाने वाढवण्यास मदत होते. रक्तातील ऑक्सिजनचा पुरवठा सुधारल्याने ऊर्जा मिळते. मरगळ व थकवा कमी होतो. तोंडाद्वारे देण्यात आलेल्या आयर्न (लोहयुक्त) गोळ्यांमुळे होणारा मळमळ किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास या इंजेक्शनमुळे टाळता येतो. गर्भधारणा व किडनीच्या आजारात याचा चांगला उपयोग होत आहे. तीव्र अशक्तपणा किंवा दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराच्या समस्या असलेल्या महिलांवर उपचारासाठी आयर्न सुक्रोज फायदेशीर आहे. या उपचार पद्धतीमुळे हिमोग्लोबिनची पातळी वाढवून अकाली प्रसूती, प्रसूती दरम्यान/नंतर रक्तस्त्राव, माता मृत्यू यासारख्या समस्या कमी होण्यास मदत होते.

रक्तक्षयाचे प्रमाण कमी करण्यासाठी केंद्र सरकारकडून 'ॲनिमियामुक्त भारत' अभियान राबवले जात आहे. याअंतर्गत सहा महिने ते १९ वर्षे वयोगटातील मुले, किशोरवयीन मुली व गरोदर महिलांमध्ये हिमोग्लोबिन तपासणीवर भर दिला जातो. जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार गरोदर महिलांत हिमोग्लोबिन ११ ग्रॅमपेक्षा कमी असल्यास रक्तक्षय मानला जातो, तर सात ग्रॅमपेक्षा कमी असल्यास तीव्र रक्तक्षय समजला जातो. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून १८२० प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३६० ग्रामीण रुग्णालये व जिल्हा रुग्णालयांमार्फत ही सेवा मोफत दिली जाते. गर्भवती महिलांना १८० दिवस आयर्न–फॉलिक ॲसिडच्या गोळ्या देणे, आहार समुपदेशन आणि वेळेवर तपासणी यावर भर दिला जात आहे.

**संकलन : धोंडिराम अर्जुन,**
विभागीय संपर्क अधिकारी




## बनावट आयफोन कसा ओळखावा?



तुम्ही आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं. बनावट आयफोन ओळखण्यासाठी पॅकेजिंग, सीरियल नंबर, आयएमईआय नंबर, बिल्ड क्वालिटी, सॉफ्टवेअर आणि आय ओ एस एडिशन तपासा. यासह आम्ही काही ट्रिक्स सांगणार आहोत, त्या जाणून घेऊया.

बाजारात अनेक नकली किंवा बनावट आयफोन उपलब्ध आहे. आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी ही बातमी नक्की वाचा, कारण आयफोन खरेदी करताना सावधगिरी बाळगली पाहिजे तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं.

ॲपलचे हे फ्लॅगशिप डिव्हाईस केवळ उत्तम फीचर्स आणि स्पेसिफिकेशन्ससाठीच प्रसिद्ध नाहीत, तर अनेकांसाठी स्टेटस सिम्बॉलदेखील आहेत. २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीत ॲपलने आयफोन विक्रीतून सुमारे ३९ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे उत्पन्न मिळविले, मात्र आयफोनच्या वाढत्या मागणीमुळे बनावट डिव्हाईसची समस्याही वाढली आहे.

सणासुदीचा हंगाम असला की बाजारात सवलत असते. याच काळात आयफोन घेण्याचा लोक प्लॅन आखतात. दुरुस्तीदरम्यान बनावट आयफोन खरेदी किंवा वास्तविक आयफोनच्या बदल्यात बनावट डिव्हाईस देण्याचे प्रमाण वाढू शकते. आपण नवीन आयफोन खरेदी करण्याचा विचार करीत असल्यास किंवा तुमच्या डिव्हाईस खरा आहे की खोटा, हे तपासण्यासाठी खालील पद्धतींचा अवलंब करा.

पॅकेजिंग आणि ॲक्सेसरीजकडे लक्ष द्या ॲपलचे पॅकेजिंग उच्च दर्जाचे आहे. अस्सल आयफोनवरील बॉक्स मजबूत असतो आणि मजकूर छपाई नीटनेटकी असते. चार्जिंग केबलसारख्या ॲक्सेसरीज ॲपलच्या मानकांची पूर्तता करणे आवश्यक आहे. छपाई सदोष असल्यास, बॉक्स सैल दिसत असल्यास किंवा ॲक्सेसरीज जुळत नसल्यास सावधगिरी बाळगा. बिल्ड क्वालिटी आणि डिझाईन तपासा गुणवत्ता मजबूत आहे. याची बटणे, स्क्रीन, वजन आणि डिझाईन ॲपलच्या मानकांनुसार आहे. बनावट डिव्हाईसमध्ये अनेकदा लोगो चुकीच्या ठिकाणी असतो, कडा रुक्ष असतात किंवा बटणे सैल असतात. सेल्फ हेल्प टिप्स व्यतिरिक्त ॲपलच्या डीलरशिपवर जाऊन तुम्ही तुमचा फोन खरा की बनावट याची माहिती मिळवू शकता.

# मराठी कादंबरीकार शिवाजी सावंत



### निमित्त

शिवाजी गोविंदराव सावंत हे मराठी कादंबरीकार होते. त्यांनी लिहिलेली मृत्युंजय ही पौराणिक कादंबरी मराठी कादंबऱ्यांत मानदंड मानली जाते. शिवाजी सावंत त्यासाठीच मृत्युंजयकार सावंत म्हणून ओळखले जातात.

शिवाजी सावंत यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० साली शेतकरी कुटुंबात, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा गावात झाला. सावंत उत्कृष्ट कबड्डीपटू होते. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण आजऱ्यात झाल्यावर त्यांनी कोल्हापुरात बीएचे प्रथम वर्ष पूर्ण केले आणि मग वाणिज्य शाखेतील पदविका घेतली. टायपिंग, शॉर्टहॅंडचा कोर्स करून त्यांनी कोर्टात कारकुनाची नोकरी केली आणि नंतर ते कोल्हापुरातील राजाराम प्रशालेत १९६२ ते १९७४ या काळात शिक्षक होते.

पुण्यात स्थायिक झाल्यावर १९७४ ते १९८० अशी सहा वर्षे त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या लोकशिक्षण या मासिकाचे सहसंपादक व नंतर संपादक म्हणून काम केले. १९८३मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि पुढील आयुष्यात फक्त लेखनावरच पूर्ण लक्ष केंद्रित केले. शिवाजी सावंत हे इ.स. १९९५पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे काही वर्षे उपाध्यक्ष होते. १९८३मध्ये बडोदा येथे भरलेल्या बडोदे मराठी साहित्य संमेलनाचे ते संमेलनाध्यक्ष होते. मृत्युंजय (१९६७) या पौराणिक कादंबरीच्या प्रस्तावनेत शिवाजी सावंत यांनी हिंदीतील केदारनाथ मिश्र यांचे कर्ण आणि रामधारी सिंह ‘दिनकर’ यांचे रश्मिरथी ह्या दोन खंडकाव्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केलेला आहे.

मृत्युंजय कादंबरीच्या लेखनासाठी शिवाजी सावंत यांना थेट कुरुक्षेत्रात मुक्काम ठोकला होता. प्रदीर्घ संशोधन, चिंतन आणि मनन यांतून रससंपन्न अशा ‘मृत्युंजय’ या वास्तववादी कादंबरीचा जन्म झाला आणि शिवाजी सावंत हे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचले. ‘मृत्युंजय’नंतर सावंतांनी ‘छावा’ ही ऐतिहासिक व ‘युगंधर’ ही पौराणिक विषयावरची कादंबरी लिहिली. शिवाजी सावंत यांची कादंबऱ्यांसहित अन्य पुस्तके इंग्लिश भाषेत अनुवादित झाली आहेत. युगंधरचा इंग्रजी अनुवाद सावंत यांची अमेरिकास्थित कन्या कादंबिनी यांनी केला आहे. मृत्युंजय या कादंबरीवर आधारलेली काही मराठी–हिंदी नाटकेही रंगभूमीवर आली. मृत्युंजय ही कादंबरी दानशूरपणासाठी प्रख्यात असलेला महान योद्धा कर्णाच्या जीवनावर, तर युगांतर ही कादंबरी भगवान श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारलेली आहे. मराठी भाषेत कसदार लेखन करून साहित्याची सेवा केल्याबद्दल त्यांना भारतीय ज्ञानपीठाच्या मूर्तिदेवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कऱ्हाड येथे भरणाऱ्या ७६व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचे ते उमेदवार होते. आपल्या उमेदवारीच्या प्रचारासाठी गोव्यात गेले असताना मडगाव येथे शिवाजी सावंत यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### फळे नेमक्या कोणत्या वेळेत खावीत?



निरोगी आयुष्यासाठी पौष्टिक आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. आहारात फळांना अनन्यसाधारण महत्त्व आहे, पण तुम्ही कधी असे ऐकले आहे का की, नीट न पचलेल्या फळांमुळे सर्दी होऊ शकते. याविषयी के अर हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ डॉ. जी सुषमा यांच्या हवाल्याने सविस्तर माहिती जाणून घेतली.

डॉ. सुषमा सांगतात, व्यवस्थित न पचलेल्या फळांचा सर्दी आणि रक्त गोठण्याशी थेट संबंध नाही. सर्दी हा एक प्रकारचा व्हायरल संसर्ग आहे जो राइनो व्हायरसमुळे होतो. तरीसुद्धा काही प्रकरणांत फळांमुळे सर्दीचा त्रास होऊ शकतो. जेव्हा तुमची रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असते तेव्हा तुमच्या शरीराकडून ॲलर्जीला प्रतिसाद मिळाल्यास सर्दी, पोटदुखी यांसारख्या समस्या उद्भवू शकतात, असे डॉ. सुषमा पुढे सांगतात.

जेव्हा फळे नीट पचत नाहीत, तेव्हा त्यांच्यावर किण्वन प्रक्रिया होऊ शकते, ज्यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होऊ शकतात. याची लक्षणे सर्दी झाल्यानंतरच्या लक्षणांसारखीच असतात, असे त्या सांगतात. डॉ. सुषमा यांच्या मते, रोगप्रतिकार शक्ती कमकुवत असणाऱ्या लोकांना पचनाच्या समस्या आणि सर्दी होण्याची शक्यता जास्त असते. जर व्हिटॅमिन सीसारख्या पोषक घटकांमुळे आरोग्याच्या समस्या वाढत असतील, तर व्हिटॅमिन सी असलेली फळे खाणे टाळा. फळांचे सेवन कमी प्रमाणात करा आणि फळे खाण्याऐवजी इतर पोषक घटकांचा आहारात समावेश करा. संतुलित आहारासाठी ताज्या भाज्या, बिया आणि सुका मेवा व प्रोटीन्सचे सेवन करा.

फळांचे सेवन हे तुम्ही कोणत्या प्रकारचा आहार घेता आणि तुमचे आरोग्य यावर अवलंबून असते. कमी प्रमाणात फळे खाणे हे खूप महत्त्वाचे आहे. कारण–अति प्रमाणात फळे खाल्ल्याने आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतो, असे डॉ. सुषमा सांगतात. उपाशीपोटी फळांचे सेवन केल्याने शरीरास चांगले पोषक घटक मिळतात आणि फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर ऊर्जेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करू शकते. जेवण करताना किंवा नंतर स्नॅक म्हणून फळे हा एक चांगला पर्याय असू शकतो.

दरम्यान, विविध ऋतूमानांनुसार बाजारात फळे उपलब्ध होत असतात. त्या त्या वेळी ती खाणे शरीरासाठी उपयुक्त ठरत असते.

# करोडी घाटाच्या पर्यायी भुयारी मार्गात वाहनांवर गळती सुरूच



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटाला भुयारी मार्गामध्ये वाहनांवर पाण्याची गळती अद्याप सुरू आहे. भुयाराचे काम पूर्ण झाल्यावर गेल्या पाच वर्षापासून छताच्या बाजूच्या कातळातून ही पाण्याची गळती रोखण्यासाठी आयआयटी मुंबईच्या सल्ल्यानुसार उपायोजना करण्याच्या बाता निष्फळ ठरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे यंदाच्याही गणेशोत्सवातील दोन्ही भुयारी मार्गांतील वाहतूक बाप्पाच्या कृपेने निर्विघ्नपणे पार पडण्याच्या प्रार्थनेखेरीज पर्याय दिसून येत नाही.

कशेडी घाटातील ६ लेन असलेल्या दुहेरी भुयारी मार्ग आणि जोडरस्त्यांच्या एकूण बांधकामासाठी सुमारे ५०२ कोटी खर्च मंजूरी निश्चित करण्यात आली होती. रिलायन्स इन्फ्रा प्रोजेक्टने या कामाचे टेंडर मिळवून शिंदे डेव्हलपमेंट प्रोजेक्ट लिमिटेड (एसडीपीएल) या पोटठेकेदार कंपनीमार्फत भुयारी मार्गाचे खोदकाम २०१९ मध्ये सुरू केले. दोन्ही भुयारी मार्गाची प्रत्येकी रुंदी १४ मीटर व उंची ८ मीटर आहे. दोन्ही बाजूंना एकूण ७ किलोमीटर लांबीचे जोडरस्ते असल्याने संपूर्ण प्रकल्पाची लांबी ९ कि.मी. आहे. यातील भुयारी मार्ग प्रत्येकी २ कि.मी. लांबीचा आहे. या भुयारी मार्गाचे काम २०२१ मध्ये पूर्ण झाल्यावर भुयारात काही अंतरावर छताकडील कातळातून भुगर्भातील पाण्याची भुयारी मार्गात वाहनांवर गळती सुरू झाली असल्याने छताकडील कातळामध्ये भुगर्भातील पाण्याचा मोठा साठा असल्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

यावर आयआयटी मुंबईच्या सल्ल्यानुसार उपायोजना करण्याच्या चर्चा पोटठेकेदारांकडून करण्यात येऊन मलमपट्टी करण्यास सुरुवात केली.बारमाही भुयारी मार्गात गळती सुरू असताना पावसाळ्यात गळतीचे प्रमाण अधिक असते. भुयाराच्या छतावरून आणि भिंतींवरून पाण्याचे मोठे फवारे उडत असल्याचे गेल्या वर्षीपर्यंत पाहायला मिळाले. यामुळे भुयाराच्या आतील रस्ता निसरडा झाल्याने अपघाताचा धोका वाढला. पाण्याचा निचरा योग्य रीतीने झाला नाही व गळती रोखण्यासाठी केलेले कोटिंगचे काम टिकू शकले नाही. ड्रेनेज आणि पन्हाळी भुयारी मार्गाच्या छतातून गळणारे पाणी थेट रस्त्यावर किंवा वाहनांवर पडू नये म्हणून विशिष्ट पन्हाळी लावून ते पाणी मुख्य ड्रेनेज लाईनद्वारे भुयाराबाहेर काढण्यात आले.

मात्र, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून गळती रोखण्यासाठी करण्यात आलेले सर्व उपाय निष्फळ ठरले असून, दोन्ही भुयारी मार्गांमधील गळती सद्यस्थितीतही सुरूच आहे. आयआयटी मुंबईच्या सल्ल्यानुसार किंवा मार्गदर्शनाखाली अंतर्गत भागातील खडकाचा दाब आणि पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्यासाठी शॉटक्रिटसह पीव्हीसी मेम्ब्रेन आणि फायबर शीटचे अस्तर बसवण्यात आले. यामुळे भुयारी मार्गातील तीन पदरी रस्त्याच्या दूतर्फा बांधलेल्या गटारांमध्ये छताच्या खडकातील गळणारे पाणी वळविण्यात आले आहे. तरीदेखील दोन्ही भुयारातील रस्ते निसरडे होऊन अपघात होऊ शकेल इतपत धोका अद्याप कायम आहे. गळणाऱ्या पाण्यामुळे दुचाकी आणि चारचाकी चालकांना गाड्या चालवताना वाहनांवर पूर्णपणे नियंत्रण ठेवावे लागणार आहे. आगामी गणेशोत्सवाच्या काळात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून कोकणात ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांना व वाहनचालकांना दोन्ही भुयारांमधील गळतीमुळे वाहने घसरण्याच्या धोक्याचा सामना करावा लागणार आहे.

तब्बल ५१२ कोटी खर्चाच्या या भुयारी मार्गातील छताकडील कातळातून भुगर्भातील पाण्याची गळती सुरू असल्याने त्यावरील उपाययोजना करण्यासाठी गळती दुरुस्तीचा खर्च किंवा गळती रोखण्याचे हे काम प्रकल्पाच्या 'दोष दायित्व' कालावधी अंतर्गत असल्यामुळे कंत्राटदार कंपनीवरच या मोफत दुरुस्तीची आणि देखभालीची जबाबदारी आहे. परिणामी, राष्ट्रीय महामार्ग विभागाकडून या दुरुस्तीसाठी स्वतंत्र किंवा वेगळा अतिरिक्त खर्च घोषित केलेला नाही. त्यामुळे गळती बंद करण्याचा खर्च मूळ कंत्राट आणि मेंटेनन्स कराराचाच भाग ठरला आहे.

सद्यस्थितीत कशेडी घाटाला पर्यायी भुयारी मार्गात हवा खेळती राहण्यासाठी आधुनिक व्हेन्टीलेशन सिस्टीम, सीसीटीव्ही कॅमेरे आणि अग्निरोधक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून हाय-टेक एलईडी पथदीप आणि आपत्कालीन परिस्थितीसाठी ११ केव्ही वीज पुरवठ्यासह जनरेटर बॅकअप देखील ठेवण्यात आले आहे. दोन्ही भुयारी मार्गाला अंतर्गत जोडणारे आपत्कालीन रस्ते आहेत. मात्र,गळतीची नेमकी कारणे शोधण्यासाठी आणि योग्य तांत्रिक तोडगा काढण्यासाठी 'आयआयटी'च्या तज्ज्ञांची मदत घेऊन दोन्ही भुयारी मार्गांचे सर्वेक्षण करण्यात येऊनही गळती सुरुच राहिल्याने आगामी गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या व कोकणातून येणाऱ्या वाहनांना निसरड्या रस्त्याच्या धोक्यालाही सामोरे जावे लागेल,हे निश्चित आहे. याखेरीज, दोन्ही भुयारी मार्गाच्या जोड रस्त्यावर बाजुच्या डोंगरातून लाल मातीचे ढिगारे आणि दरडी कोसळण्याच्या धोकाही गेल्या वर्षभरात वाढला आहे.

मात्र, याबाबत 'एसडीपीएल'चे अमोल शिवतारे यांनी गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यावर्षी गळतीचे प्रमाण कमी झाल्याचा दावा करीत लवकरच दोन्ही भुयारी मार्ग गळती मुक्त करण्याची ग्वाही प्रस्तुत प्रतिनिधीस बोलताना दिली. या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे अभियंता पंकज गोसावी आणि अमोल माडकर यांनी 'एसडीपीएल'चे अमोल शिवतारे यांनी दिलेल्या माहितीला दुजोरा दिला.

## रक्षाबंधनानिमित्त पोलीस बांधवांना राष्ट्रवादी काँग्रेसकडून स्नेहाची राखी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड पोलीस स्टेशन हद्दीत उत्तमरीत्या कायदा व सुव्यवस्थाहाताळून शांततेचे वातावरण अबाधित ठेवण्यासाठी मुरुड पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे हे नेहमीच कार्यतत्पर राहिले आहेत .मुरुड तालुका महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीनेरक्षाबंधन सणानिमित्त मुरुड तालुक्यातील पोलीस बांधवांचे औक्षण करून त्यांना राखी बांधण्यात आली व रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.



यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर ,वासंती उमरोटकर मुरुड तालुका महिला अल्प संख्याक अध्यक्षा मुसरत उल्डे, नगरसेविका प्रमिला माळी, मुरुड शहर महिला अध्यक्षा शीतल घरत आदी सह महिलांनी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्यासह पोलिसांना राख्या बांधून रक्षा बंधन हा सण उत्सहात साजरा करण्यात आला .

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सदैव तत्पर असणाऱ्या आपल्या पोलीस बांधवांप्रती कृतज्ञता आणि स्नेह व्यक्त करण्यात आला .यावेळी सर्व पोलीस बांधवांना रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे देण्यात आल्या.

## यशवंतनगर विद्यालयाचे योगेश पाटील कोकण विभाग गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**मुरूड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेतर्फे दरवर्षी दिला जाणाऱा राज्यस्तरीय कोकण विभाग गुणवंत शिक्षक सन २०२६ पुरस्कार यावर्षी यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील शिक्षक योगेश रामदास पाटील यांना नुकताच प्रदान करुन त्यांना सन्मानित करण्यात आले.

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक विद्यालय कळंबोली येथे शनिवारी झालेल्या एका शानदार कार्यक्रमात कोकण विभाग शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाडीकर, जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील आदींच्या प्रमुख उपस्थितीत पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी रायगड जिल्ह्यातील विविध माध्यमिक शाळांतील शिक्षक, कर्मचारी,पुरस्कर्त्यांचे नातेवाईक,मित्र ,सहकारी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक योगेश पाटील यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## रेवदंडा ते अलिबाग मार्गावर स्वच्छतेचा महासंकल्प; १,२१० श्री सदस्यांचे श्रमदान; ५२.२ टन कचरा संकलित

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम न राहता प्रत्येक नागरिकाच्या जीवनशैलीचा भाग व्हावी, या उद्देशाने डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी रेवदंडा परिसरासह साळाव ते अलिबाग मार्गावर व्यापक स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात रेवदंडा, चौल, नागाव, आक्षी आणि अलिबाग परिसरातील १,२१० श्री सदस्य व ग्रामस्थांनी श्रमदान करत तब्बल ५२.२ टन कचरा संकलित केला.



साळाव चेकपोस्ट ते अलिबाग बायपास तसेच नागाव-सहान बायपास पुलापर्यंतच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजू, रेवदंडा परिसरातील अंतर्गत रस्ते अशा एकूण सुमारे ५३ किलोमीटर परिसराची स्वच्छता करण्यात आली. याशिवाय स्मशानभूमी आणि समुद्रकिनाऱ्याचा सुमारे ३ किलोमीटर परिसरही स्वच्छ करण्यात आला.

हातात झाडू, फावडे आणि स्वच्छतेचे साहित्य घेऊन श्री सदस्य व ग्रामस्थांनी रस्त्याच्या दुतर्फा साचलेला कचरा, पालापाचोळा, झाडाझुडपे तसेच अन्य घाण हटविली. मोठ्या प्रमाणावर झालेल्या या श्रमदानामुळे रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि समुद्रकिनारा स्वच्छ व सुस्थितीत आणण्यात आला. संकलित करण्यात आलेल्या ५२.२ टन कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्यात आली.

डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना

स्वच्छता अभियानादरम्यान साचलेल्या पाण्याच्या ठिकाणी डासांची उत्पत्ती होऊ नये आणि डासांचा प्रादुर्भाव कमी व्हावा, यासाठी डी.डी.टी. पावडरची फवारणी करण्यात आली. त्यामुळे परिसर स्वच्छ करण्याबरोबरच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही खबरदारी घेण्यात आली.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांनी समाजप्रबोधनातून स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व समाजासमोर मांडले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत पद्मश्री व महाराष्ट्र भूषण डॉ. श्री दत्तात्रेय नारायण तथा आप्पासाहेब धर्माधिकारी तसेच महाराष्ट्र भूषण डॉ. श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य जनजागृती, जलसंवर्धन आणि पर्यावरण संवर्धन यांसारखे विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

आजच्या अभियानातून १,२१० श्री सदस्यांनी एकजुटीने केलेले श्रमदान आणि ५२.२ टन कचऱ्याचे संकलन हे स्वच्छतेच्या सामूहिक शक्तीचे प्रभावी उदाहरण ठरले. सार्वजनिक ठिकाणे ही आपलीच जबाबदारी आहेत, हा संदेश या व्यापक अभियानातून देण्यात आला.

## पेणच्या उपजिल्हा रुग्णालयात बाळाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील उपजिल्हारुग्णालयातील अपुऱ्या सुविधा आणि वैद्यकीय यंत्रणेच्या कथित अनास्थेमुळे नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या घटनेमुळे जिल्हा उपरुग्णालयातील आरोग्य सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

जिते येथील शितल प्रकाश पाटील यांची २६ऑगस्ट रोजी पेण जिल्हा उपरुग्णालयात सिझेरियनद्वारे प्रसूती झाली. त्यांनी एका बाळाला जन्म दिला. मात्र, २८ ऑगस्ट रोजी बाळाची शुगर कमी झाल्याने त्याला पेण येथील महाजन दवाखान्यात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांच्या देखरेखीखाली बाळाला एक दिवस ठेवण्यात आले. उपचारानंतर बाळाची प्रकृती सुधारल्याचे सांगण्यात आल्याने २९ ऑगस्ट रोजी बाळाला पुन्हा पेण जिल्हा उपरुग्णालयात आणण्यात आले. मात्र, उपरुग्णालयात दाखल केल्यानंतर काही वेळातच बाळाचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला.



बाळाच्या मृत्यूचे नेमके कारण काय, याबाबत स्पष्ट माहिती मिळत नसल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रसूतीनंतर बाळाची योग्य प्रकारे देखभाल करण्यात आली नाही, तसेच रुग्णालयात आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. दरम्यान, या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी, नातेवाईक तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी रुग्णालयाचे अधीक्षक ज्ञानेश्वर आरसाळे यांच्याशी वारंवार संपर्क साधून रुग्णालयात उपस्थित राहण्याची विनंती केली. मात्र, ते रुग्णालयात उपस्थित झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. महत्त्वाचे म्हणजे, डॉक्टर आशिष मेश्राम हे रुग्णालयात उपस्थित असल्याचे सांगण्यात आले,

## माणगावमध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

उम्मते मुस्लीमा कमिटी माणगाव तालुका यांच्यावतीने ईद-ए मिलाद निमित्त शासकीय रुग्णालय अलिबाग रक्तपेढी यांच्या विशेष सहकार्याने रविवार दि.३० ऑगस्ट रोजी अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय माणगाव या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद लाभून शिबिरात ५१ रक्तबॅगा संकलित करण्यात आल्या.

या रक्तदान शिबिरास भरघोस प्रतिसाद मिळाल्याने आयोजकांचे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे,सज्जाद डावरे,रवींद्र मोरे, माजी नगराध्यक्ष आनंद यादव,राजिपचे माजी सभापती ज्ञानदेव पवार,माजी नगरसेवक सिराज परदेशी,मुफ्ती मुजफ्फर सेन,विरेश येरुणकर यांच्यासह अनेक मान्यवरांनी शिबिराला भेट दिली.

सदर शिबिराच्या उदघाटन कुराण पठणाने मन्सूर मुकादम यांनी अलिबाग रक्तपेढीची टीम,उम्मते मुस्लीमा कमिटी माणगाव तालुक्याचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच रक्तदाते यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय रक्तपेढी अलिबागचे वैद्यकीय अधिकारी डॉ. बहिर्जी कदम,रक्तपेढी तंत्रज्ञ हेमकांत सोनार,सुशांत भगत,अनिल प्रजापती,मनीषा नवाले,जगताप सहाय्यक मंगेश पिंगला,उम्मते मुस्लीमा तर्फे अकबर परदेशी,शादाब गैबी बशीर करेल,इस्माईल पालेकर,अत्तार,मन्सूर मुकादम,इरफान हाजीते आदिल गजगे,मुसद्दीक जिलानी,मुन्ना येशवीकर,मौलाना अमीर नदाफ यांच्यासह सर्व सहकाऱ्यानी विशेष परिश्रम घेतले.




**जाहीर नोटीस**

अॅड. मनोहर नारायण पाटील

**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे कोर्टात**

एच. एम. पी. क्र. ५६६/२०२५

सौ. कविता दिपक मेहता
पुर्वाश्रमीची कविता रोशनलाल बाफना
उ.व. ४३, धंदा- गृहिणी, रा. अशोका गार्डन, सी.एच.एस
महात्माफुले रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड } अर्जदार

विरुद्ध,

श्री. दिपक चतरलाल मेहता,
उ.व. ४३, धंदा- व्यवसाय,रा. ५०४,बीएलडीजी १,
पीएल- ९४/३-४-५-६-७, निल पार्क, सीएचएस लि.
पनवेल. ४१०२०६ रायगड- } सामनेवाला

सदर जाहीर नोटीशिने सर्व जनतेस असे कळविणेत येते की,

सामनेवाला याच्याविरुद्ध पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर यांचे कोर्टात एच.एम.पी. क्र. ५६६/२०२५ दाखल झालेला आहे. सदरच्या अर्जाची तारीख दिनांक ०१/१०/२०२६ अशी नेमण्यात आलेली आहे. तरी सदर तारखेच्या दिवशी वर नमुद सामनेवाला यांनी स्वतः अगर आपल्या वकीलांमार्फात हजर राहण्याकरीता सदरची जाहीर नोटीस देण्यात आलेली आहे.

सबब सामनेवाला याने स्वतः अथवा आपल्या वकीलांमार्फत दिनांक ०१/१०/२०२६ रोजी मे. कोर्टात सदर अर्जाकामी हजर राहावे. येणेप्रमाणे सदर तारखेच्या दिवशी मे. कोर्टात सदरकामी हजर न राहिल्यास त्याच्याविरुद्ध सदरचा अर्ज एकतर्फी चालविण्यात येईल याची सामनेवाला याने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहिर नोटीस आमच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आजरोजी दिली.

**व लिपिक**
**मे. दिवाणी न्यायालय व स्तर**
**पनवेल**

(सही व शिक्का)

**सहा अधिक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय व स्तर**
**पनवेल**



**सिडको**
शहरांचे शिल्पकार

**नोटीस-१**

साडेबावीस टक्के विकसित भूखंड वाटप योजनेअंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यास ''ना हरकत प्रमाणपत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस १) बाळकृष्ण काशिनाथ भगत २) इंदुबाई रामनाथ भगत ३) अमर रामनाथ भगत ४) मच्छिंद्र रामनाथ भगत ५) मंदार रामनाथ भगत ६) वैशाली नामदेव मढवी ७) वैजंती संदिप नाईक ८) राजू विश्वनाथ भगत ९) शिवाजी विश्वनाथ भगत १०) प्रभाकर उर्फ मनोहर काशिनाथ भगत ११) यशोदा काशिनाथ भगत उर्फ सुनिता रेवनाथ पाटील १२) श्रीधर काशिनाथ भगत १३) सुरेश काशिनाथ भगत १४) प्रल्हाद काशिनाथ भगत १५) भास्कर काशिनाथ भगत, राहणार - शेलघर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड-४१० २०६

------- (अर्जदार)

ज्याअर्थी अर्जदार बाळकृष्ण काशिनाथ भगत व इतर यांना २२.५% योजनेअंतर्गत खालील तक्त्यात नमूद त्यांना वाटपित करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. गोठीस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) अंबावी महादेव गोठी २) महादेव प्रागजी गोठी यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' अर्ज केला आहे. त्याअनुषंगाने भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ४२५३ | २१.०७.२०२६ | पुष्पक नोड | २८ | ०२ | ६०००.०० चौ. मी पैकी ३०००.०० चौ. मी | ०९.०२.२०२६ | २०.०३.२०२६ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**(स्वाक्षरी)**
**प्र. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२०६/२०२६-२७

# गव्हाणमधील दरोड्याचा छडा

## पाच आरोपी गजाआड



**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील गव्हाण गावात पहाटे घरात घुसून चाकूचा धाक दाखवत सुमारे नऊ लाख रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीचा उलवा पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून वाहनांसह सुमारे आठ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गव्हाण येथील ५३ वर्षीय महिलेच्या घरात पहाटेच्या सुमारास आरोपींनी प्रवेश केला. चाकूचा धाक दाखवत घरातील व्यक्तींना धमकावल्यानंतर सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने आणि दोन लाख रुपये रोख असा ऐवज घेऊन आरोपी पसार झाले होते. या घटनेने परिसरात खळबळ उडाली होती.घटनेनंतर उलवा पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपींचा माग काढत पोलिसांनी बदलापूर व ठाणे परिसरातून काही आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीतून गव्हाण परिसरातील अन्य आरोपींची माहिती समोर आली. त्यानंतर आणखी तिघांना अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये रोहित शांताराम मालुसरे (२७), सुरज राजू गायकवाड (१९), दिपेश सुरेश भोईर (२३), प्रवीण सदानंद कोळी (३१) आणि फरहान अल्ताफ शेख (१९) यांचा समावेश आहे. टोळीतील आणखी काही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलिसांनी आरोपींकडून कार, मोटारसायकल, स्कूटर, चार मोबाइल आणि ४५ हजार रुपये रोख असा एकूण आठ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे, मात्र तक्रारीनुसार लुटलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी अद्याप एकही दागिना पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

दोन लाखांपैकी ४५ हजार रुपये जप्त करण्यात आले. उर्वरित सोने व रोकड कुठे आहे याचा तपास पोलीस करीत आहेत. अटक आरोपींपैकी काहींवर यापूर्वीही विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

# सर्वसाधारण सभेत रस्ते, पदपथ, गटार सुधारणेच्या कामांना मंजुरी

**नवी मुंबई : बातमीदार**

ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या व सभागृहनेते सागर नाईक यांनी सभागृहापुढे मान्यतेसाठी सादर केलेल्या विविध नागरी सुविधा कामांच्या प्रस्तावांना पिठासन अधिकारी महापौर सुजाता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते मंजुरी मिळाली.



से. २१ नेरूळ येथील शंकराचार्य उद्यानाच्या मागे असलेल्या रिंग रोड व रेडियल रोडवर मोठ्या प्रमाणात रहदारी असते. या ठिकाणी सखल भाग असल्याने पाणी साचून रस्ता खराब होत असल्याने सदर रस्त्याची डांबरीकरणाने सुधारणा करण्याच्या कामास मान्यता देण्यात आली.नेरूळ विभागात सिडको प्राधिकरणाच्या अखत्यारीतील दगड खाणीच्या जागेवर कत्तलखान्याकरिता भूखंड उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भटक्या कुत्र्यांसाठी निवारा शेड बनविणे प्रस्तावित आहे. सदर भूखंडाचा भाग डोंगराळ असल्याने भूखंडापर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक भूभराव करून व डब्ल्यूबीएमने पोहोच रस्ता तयार करणे आवश्यक आहे. या रस्त्याच्या कामास सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली.

तुर्भे टीटीसी एमआयडीसी क्षेत्रात विविध संस्थांमार्फत सेवा पुरविण्यासाठी परवानगी घेऊन खोदकाम करण्यात आलेले आहे. परवानगी देताना खोदकाम पूर्ववत करण्याचे शुल्क भरून घेण्यात आलेले आहे. सदर खोदलेल्या चरांचे डांबरीकरणाने पुनर्पृष्ठीकरण करून रस्ते सुधारणा करण्याच्या कामास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सानपाडा से. १४ येथील शंकर टॉवर ते पोलीस स्टेशनपर्यंत असलेले हेवी ड्युटी पावसाळी गटार नादुरुस्त होऊन मोडकळीस आलेले आहे. त्यानुसार रस्त्याची रुंदी वाढवून हेवी ड्युटी पावसाळी गटाराची पुनर्बांधणी करण्याच्या कामास मंजुरी प्राप्त झाली.

# क्यू नेटच्या नावाखाली १९ लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्यू नेट या व्यवसायात पैसे गुंतवल्यास जास्त नफा मिळतो, असे सांगून १९ लाख तीन हजारांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी विक्रमसिंग शंकरसिंग भदोरिया (रा. उत्तर प्रदेश) याच्या विरोधात २७ ऑगस्ट रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी यांना आरोपीने क्यू नेट व्यवसायात पैसे गुंतवल्यास खूप नफा मिळतो, असे सांगून नफ्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्याकडून २१ लाख १० हजार रुपये वैयक्तिक खात्यावर घेतले.

विश्वास बसावा म्हणून त्यांना वस्तू आणि रक्कम असे मिळून दोन लाख सात हजार रुपये परत केले. उर्वरित १९ लाख तीन हजार रुपये आणि व्यवसायातील नफ्याबाबत मागणी केली असता आरोपीने संपर्क टाळला आणि तुला जे करायचे ते कर, मी पैसे परत देणार नाही, असे सांगून फसवणूक केली.

# दिवाळे कोळीवाड्यात अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या विकासाने गावठाणांच्या अवतीभोवती आधुनिक आणि सुनियोजित शहर उभे राहिले. उंच इमारती, रुंद रस्ते आणि बदललेल्या जीवनशैलीसोबत शहराचा चेहरामोहरा बदलला असला तरी या आधुनिकतेच्या मुळाशी असलेल्या गावठाणांनी आपल्या रूढी-परंपरा, देव-धर्म आणि सांस्कृतिक वारसा आजही जपून ठेवला आहे. याच जिवंत परंपरेचे दर्शन सध्या दिवाळे कोळीवाड्यात घडत असून हनुमान मंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाने गावठाणातील भक्तीची परंपरा पुन्हा एकदा उजळून निघाली आहे.



शहर बदलले, काळ बदलला, जीवनशैली बदलली; मात्र गावच्या देवाप्रतिची श्रद्धा आणि संतपरंपरेशी जोडलेली नाळ आजही कायम आहे. टाळ-मृदुंगाचा निनाद, हरिनामाचा जयघोष आणि संतवाणीच्या गजराने दिवाळे कोळीवाडा सध्या भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. २९ ऑगस्टपासून सुरू झालेला हा अखंड हरिनाम सप्ताह धार्मिक सोहळ्याबरोबरच गावठाणाच्या सांस्कृतिक अस्तित्वाची जपणूक करणारा उत्सव ठरत आहे. सात दिवस चालणाऱ्या या सप्ताहात पहाटेपासून रात्रीपर्यंत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटे काकड आरती, संत तुकाराम गाथेचे भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ आणि रात्री भजनसेवेमुळे मंदिर परिसर दिवसभर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघत आहे.

सप्ताहानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.पंचक्रोशीतील विविध गावांमधील भजन मंडळांच्या सहभागामुळे दिवाळे कोळीवाड्यात पुन्हा एकदा गावपणाची ऊब आणि सामूहिक भक्तीची परंपरा अनुभवायला मिळत आहे. गजानन प्रासादिक भजन मंडळ, संत ज्ञानेश्वर प्रासादिक भजन मंडळ, शिवशंकर प्रासादिक भजन मंडळ, ज्ञानराज प्रासादिक भजन मंडळ, हरि ॐ साई भजन मंडळ आणि गुरुकृपा भजन मंडळ यांच्यासह विविध भजन मंडळे सप्ताहात सेवा देणार आहेत.

कीर्तनकार हभप स्नेहलताई पित्रे यांचे कीर्तन सादर होणार असून प्रेम सागर ब्रास बँड, छाया कला सर्कल ब्रास बँड आणि साई कला सर्कल यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रंगत यानिमित्ताने असेल.

# जवानांना राखी बांधून रोटरी क्लबची कृतज्ञता

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

देशाच्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांसोबत रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे रक्षाबंधन सण उत्साहात साजरा करण्यात आला. रोटरी क्लबच्या महिला भगिनींनी जवानांच्या कार्यालयात जाऊन त्यांना राखी बांधली.

यावेळी एका जवानाने "आज हमारी कलाई सूनी नहीं रही..." अशी भावना व्यक्त केली, यामुळे वातावरण भावूक झाले. नीलम सोमाणी आणि जवानांनी रक्षाबंधन गीतांचे सादरीकरण केले. निरीक्षक पी. के. पाटील यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व विशद केले.



उपक्रमास रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या स्टाफसह फर्स्ट लेडी डॉ. प्रतिभा महिंद्रकर, डॉ. धीरज जैन, शशिकांत शानबाग, अमित शाह, सचिव नागेश कदम यांचे सहकार्य लाभले.समारोपप्रसंगी अध्यक्ष देवेंद्र महिंद्रकर यांनी महिला भगिनींना भेटवस्तू देऊन सन्मान केला.

यावेळी उमाताई मुंढे, वर्षा पाटील, प्रतीक्षा कुरांगळे, डॉ. लेखा उचिल, सागर चव्हाण, सुशांत उचिल, विजय पाटील, संजय मोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश काळे यांनी केले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून ती गर्भवती राहिल्याप्रकरणी २० वर्षीय आरोपीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. १७ वर्षे नऊ महिने वयाच्या पीडितेवर मे-जून २०२६मध्ये जबरदस्तीने अत्याचार करण्यात आला. हा गुन्हा कल्याण रेल्वे पोलीस ठाण्यातून पनवेल पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# नफ्याच्या आमिषाने ३२ लाखांची फसवणूक

**नवीन पनवेल :** शेअर बाजारात जास्त नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ३२ लाखांची ऑनलाइन फसवणूक केल्याप्रकरणी आलिया नामक टेलिग्राम खातेधारकाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २८ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे सेक्टर ९ येथील राजन जयस्वाल यांना आलिया या टेलिग्राम खातेधारकाने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवण्यास सांगून जास्त नफ्याचे आमिष दाखवले. राजन यांनी ५ ते २५ ऑगस्टदरम्यान टप्प्याटप्प्याने ३२ लाख रुपये विविध बँक खात्यांवर ट्रान्सफर केले. त्यानंतर पैसे परत मागितले असता ते मिळाले नाहीत. आपली ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी सायबर पोर्टलवर तक्रार दाखल केली.

# गव्हाण विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

हॉकीचे जादूगार आणि महान भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण भारतात २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शनिवारी (दि. २९) राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांच्या नियोजन व मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, लाइफ वर्कर डी. के. म्हात्रे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, क्रीडाप्रमुख सुरेश पारखे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व सेवकवर्ग यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडांगणावर एकत्रित करून विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पाचवी ते सातवी गटातील विद्यार्थ्यांसाठी धावणे, खो-खो, अडथळा शर्यत, रिले आदी क्रीडा प्रकार घेण्यात आले, तर आठवी ते दहावी गटातील विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, खो-खो यांसह विविध मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. उल्लेखनीय कामगिरी करून यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. उपशिक्षिका प्रतिज्ञा घरत तसेच दुर्गा फाउंडेशन, नवी मुंबई यांच्या वतीने विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले. या गौरवामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले तसेच इतर विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहन मिळाले. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना क्रीडा ही केवळ स्पर्धा नसून शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे, हा संदेश देण्यात आला.



# शिक्षक सुभाष राठोड यांची राष्ट्रीय मंचावर चमकदार कामगिरी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि शैक्षणिक परंपरा राष्ट्रीय मंचावर प्रभावीपणे मांडत रसायनी पाताळगंगा परिसरातील वडगाव जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक सुभाष राठोड यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्राचा लौकिक राष्ट्रीय स्तरावर उंचावला आहे. भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ५१८ व्या पायाभूत प्रशिक्षण अभ्यासक्रमात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत राठोड यांनी आपल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे प्रभावी सादरीकरण केले.

दि. ४ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट या कालावधीत सांस्कृतिक स्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (सीसीआरटी), १५-अ, सेक्टर ७, द्वारका, नवी दिल्ली येथे हा राष्ट्रीय प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला. देशातील १६ राज्यांमधील ११५ शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला होता. या राष्ट्रीय मंचावर महाराष्ट्राच्या चमूने राज्याची गौरवशाली ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा विविध कलांच्या माध्यमातून सादर केली.

प्रशिक्षण कार्यक्रमातील विशेष आकर्षण ठरले ते रायगडचे शिक्षक सुभाष राठोड यांनी आपल्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत राबविलेल्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे सादरीकरण. वारली आर्ट वॉल, हँगिंग फार्म आणि रोज रीडिंग गार्डन यांसारख्या अभिनव उपक्रमांची माहिती त्यांनी राष्ट्रीय मंचावर दिली. तसेच अल्काइल अमाईन्स यांसारख्या नामांकित कंपन्यांच्या सीएसआर निधीतून शाळेत झालेल्या उल्लेखनीय विकासकामांची माहितीही त्यांनी सादर केली.

# विद्याभवन संकुलात विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण सोहळा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शिक्षण संकुल, नेरूळ येथे विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण सोहळा मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सागर नानासाहेब भानवसे, राज्यकर निरीक्षक, जीएसटी विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच विशेष अतिथी म्हणून त्यांच्या पत्नी विशाखा भानवसे, ज्युनिअर शास्त्रज्ञ उपस्थित होत्या. संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ आणि मुख्याध्यापिका श्रीजा नायर यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

पुणे विद्यार्थी गृहाचे माजी विद्यार्थी संकेत वैद्य यांच्या संकल्पनेतून दरवर्षी शाळेत लोकशाही पद्धतीने विद्यार्थी मंडळाची निवडणूक घेतली जाते. या निवडणूक प्रक्रियेतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी परिषदेची स्थापना मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते नवनिर्वाचित विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना पदाची शपथ, बॅच तसेच विद्यार्थी परिषदेचे सदस्यत्व प्रदान करण्यात आले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्रमुख अतिथी सागर भानवसे यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने बाळगा, नियमित वाचन करा, परिश्रम करा आणि अपयशाने खचून जाऊ नका, असा प्रेरणादायी संदेश दिला.

शिक्षणाबरोबरच मूल्ये व संस्कार जपण्याचे आवाहन करत त्यांनी वृत्तपत्रांचे नियमित वाचन करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे महत्त्व विशद केले. विशाखा भानवसे यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देऊन आवडीनुसार योग्य क्षेत्राची निवड करावी, असा सल्ला दिला. विद्यार्थ्यांनी सतत प्रश्न विचारावेत, चुकांची पुनरावृत्ती टाळावी आणि भविष्यात एक चांगला नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि अभ्यासूवृत्ती अंगीकारल्यास भविष्यात उत्तुंग यश संपादन करता येते, असे मार्गदर्शन केले.

यावेळी मराठी विभागाचे मुख्याध्यापक गोरख कदम, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कल्पना सोनार यांनी केले. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, लोकशाही मूल्ये, जबाबदारीची जाणीव आणि सामाजिक बांधिलकी निर्माण करणारा हा पदग्रहण सोहळा प्रेरणादायी ठरला.



# महाड आगारात खड्ड्यांना तलावाचे रूप, बसेससह प्रवाशांचा चिखलातून प्रवास!




**महाड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक महाड शहरात असलेल्या एसटी महामंडळाच्या बस स्थानकामध्ये गुडघाभर पाणी साचेल एवढे खड्डे तयार झाले आहेत. याचं साचलेल्या पाण्यात बसेस थांबत असल्याने प्रवाशांना या चिखलातून प्रवास करावा लागत आहे. महाड बस स्थानकातील आगार प्रमुखांची बदली झाली असली तरी या ठिकाणी अध्याप नवीन आगार प्रमुख दाखल झाले नसल्याने महाड आगाराला कोणीच वाली नसल्याचे दिसून येत आहे.

महाड शहरातील बस स्थानकाकडे गेली दशकापासून दुर्लक्ष होत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांसह प्रवाशांचे देखील मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. महाड एसटी स्थानकातील गैरसोयी या जाणीवपूर्वक केल्या जात असल्याचा आरोप देखील अनेक वेळा स्थानिक नागरिकांनी केला आहे. बस स्थानकामध्ये सध्या भले मोठे खड्डे पडलेले असताना देखील या खड्ड्याकडे देखील प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. गतवर्षी या ठिकाणी काही भागातच लाखो रुपये खर्च करून कॉंक्रिटीकरणाचे केलेले काम पाण्यातच गेल्याचे स्पष्ट होत आहे. आगाराच्या प्रवेशद्वारावरच खड्डे पडून या खड्ड्यांना तलावाचे रूप आले आहे. येणाऱ्या बसेस खड्ड्यामध्ये अनेक वेळा अडकून पडल्या आहेत तर पुढील आणि मागील भाग या खड्ड्यांमध्ये लागून एसटी बसेसचे देखील नुकसान होत आहे. तळ कोकणात जाणाऱ्या गाड्या आणि रायगड, बिरवाडी, विन्हेरे जाणाऱ्या गाड्या ज्या ठिकाणी थांबतात त्या ठिकाणीच हे भले मोठे खड्डे पडलेले आहेत. यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्याचप्रमाणे महाड आगारातील तांत्रिक विभागाकडे जाणाऱ्या रस्त्यावर देखील पाणी साचल्यामुळे तलावाचे रूप आले आहे.

महाड एसटी स्थानक हे मुंबईपासून कोकणापर्यंतचे मध्यवर्ती ठिकाण असलेले स्थानक आहे. मात्र गेली वीस वर्षाहून अधिक काळापासून या स्थानकाच्या देखभाल दुरुस्तीवर लाखो रुपये खर्च करून वाया घालवले जात आहेत. मूळ इमारत असलेल्या मागील बाजूस चालक वाहक जीव मुठीत धरून वास्तव्य करतात. काही महिन्यांपूर्वी या ठिकाणी इमारतीचा सज्जादेखील तुटला होता. बस स्थानकाच्या या दुरावस्थेवर वरिष्ठ कार्यालयाकडून कायम दुर्लक्ष केले गेले आहे. होणारी नवीन इमारत देखील दोन वर्षांपासून अर्धवट अवस्थेतच आहे. वारंवार मागणी करून देखील याकडे वरिष्ठ कार्यालयाकडून लक्ष दिले गेलेले नाही. यामुळे प्रवाशांच्या बसण्याच्या ठिकाणी असलेले शेड देखील मोडकळीस आलेले आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्याच मतदारसंघातील आगाराची ही दुरवस्था असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. याबाबत त्यांनी जातीने लक्ष घालून प्रवाशांचा हा प्रश्न सोडवावा अशी मागणी जोर धरत आहे.

## पेणमध्ये अल्पवयीन मुलीवर अत्याचार, आरोपी ताब्यात

**पेण : प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कोप्रोली येथील २३ वर्षीय विपुल पाटील याने १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला फसवून कासमाळ येथे फिरायला नेले आणि तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याची तक्रार पीडित मुलीच्या वडिलांनी पेण पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २११/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ६४ (२) (आय), ६५ (१), तसेच पोक्सो कायदा २०१२ मधील कलम ४ व ६ तसेच भादविस कलम ३७६ (२) (आय), ३७६ (३) संबंधित गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने अल्पवयीन मुलीला फिरायला नेण्याच्या बहाण्याने कासमाळ येथे नेले. तेथे त्याने तिच्या इच्छेविरुद्ध अत्याचार केल्याचा आरोप असून, त्यानंतर तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता पेण पोलिसांनी आरोपी विपुल पाटील याला ताब्यात घेतले असून या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आल्याने अशा घटनांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नवनाथ रसाळ आणि महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर करीत आहेत.

अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेशी खेळणा-यांवर कठोर कारवाई होणार का? असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## आरे बुद्रुक केंद्र शाळेत माजी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील केंद्रशाळा आरे बुद्रुक येथे दोस्ती ग्रुप व माजी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यक्रमाचे शनिवारी (दि. २९ ) रोजी आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना वह्या, कंपास तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. माजी विद्यार्थी अंकिता भगत व रोशन शिंदे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळावी, त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे आणि माजी विद्यार्थ्यांचे शाळेशी असलेले ऋणानुबंध कायम राहावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पत्रकार तथा रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष जितेंद्र जाधव म्हणाले, "देशाच्या भवितव्यासाठी आजची विद्यार्थी पिढी अत्यंत महत्त्वाची आहे. मात्र शहरीकरण वाढत असताना ग्रामीण भागातील अनेक शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी होत असून काही शाळा बंद पडल्या आहेत. तालुक्यात आज केवळ २११ शाळा सुरू असल्याची परिस्थिती लक्षात घेता ग्रामीण शिक्षणव्यवस्थेकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे."

"ग्रामीण विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातच दर्जेदार व पोषक शैक्षणिक वातावरण मिळाले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानासह मराठी आणि इंग्रजी भाषेचे सक्षम शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने ग्रामीण शाळांना आवश्यक सुविधा व सहकार्य द्यावे. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी असलेले नाते जपत केलेली मदत निश्चितच कौतुकास्पद असून अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळते," असे आवाहन जाधव यांनी केले.

## नागोठण्यातील अतिक्रमणावर अखेर प्रशासनाचा हातोडा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे शहरातील वाढत्या अतिक्रमणामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील अरुंद जागा आणि नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन नागोठणे ग्रामपंचायत व नागोठणे पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेण्यात आली आहे. शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी या मोहिमेला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.

या अतिक्रमण हटाव मोहिमेप्रसंगी सरपंच सुप्रिया संजय महाडिक, उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, पहिले लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे, ग्रामपंचायत सदस्य ॲड. प्रकाश कांबळे, संतोष नागोठणेकर, भाविका गिजे, ज्योती राऊत, विनिता पाटील यांच्यासह ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी तसेच नागोठणे पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

नागोठणे शहरातील रस्ते व सार्वजनिक जागांवर दुकानदार, गाळेधारक तसेच टपरीधारकांकडून करण्यात आलेले अतिक्रमण स्वतःहून हटवून प्रशासनाला सहकार्य करावे, अशा सूचना ग्रामपंचायत प्रशासनाकडून संबंधित अतिक्रमणधारकांना नोटिसा देऊन करण्यात आल्या होत्या. नोटीस देऊनही अतिक्रमण न हटविल्यास शनिवार, दि. २९ ऑगस्ट रोजी अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येईल, असा इशारा नागोठणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांनी दिला होता. त्यानुसार शनिवारपासून ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात करण्यात आली असून विशाल मेडिकल ते छत्रपती शिवाजी



महाराज चौक या परिसरातून कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे रस्त्यालगतचे अतिक्रमण करणाऱ्या दुकानदार व टपरीधारकांमध्ये एकच खळबळ उडाली.

दरम्यान, सोमवार, दि. ३१ ऑगस्टपासून ही कारवाई पुढेही सुरूच राहणार असल्याचे ग्रामपंचायत प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या पुढील भागातील अतिक्रमण केलेले दुकानदार, गाळेधारक व टपरीधारक यांनी स्वतःहून आपले अतिक्रमण हटवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांनी केले आहे.

अतिक्रमण हटाव मोहीम ही कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून सार्वजनिक हितासाठी आहे. नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक सुरळीत होणे आणि शहरातील रस्ते मोकळे राहणे हा या कारवाईमागील मुख्य उद्देश आहे. संबंधितांनी स्वतःहून अतिक्रमण हटवून ग्रामपंचायतीस सहकार्य करावे असे आवाहन सरपंच सुप्रिया संजय महाडिक यांनी केले.

## गोरेगावचे स्वयंभू श्री वरदेश्वर देवस्थान

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील श्री स्वयंभू वरदेश्वर महादेव देवस्थान हे परिसरातील भाविकांचे श्रद्धास्थान म्हणून प्रसिद्ध आहे. स्वयंभू शिवलिंग, जमिनीतून प्रकट झालेल्या तीन लिंगांची आख्यायिका आणि विशेष म्हणजे उभा नंदी यामुळे या देवस्थानाला आगळेवेगळे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मंदिरातील माहितीफलकानुसार, श्री वरदेश्वर हे स्वयंभू देवस्थान असून या देवस्थानाची आख्यायिका विनायक उपाध्ये यांनी सांगितली आहे.

**जमिनीतून वर आली तीन लिंगे**

आख्यायिकेनुसार, पूर्वजांच्या काळात या ठिकाणी देवीचे देऊळ बांधण्याचे काम सुरू असताना जमीन खोदण्यात आली. त्यावेळी जमिनीतून तीन लिंगे वर आली. ही तीन लिंगे पिंडीच्या खाली जमिनीत असून, त्यांच्याभोवती पाणी असल्याचे सांगितले जाते. पुढे श्री मल्लिकार्जुन यांनी श्री. विनायक रामचंद्र उपाध्ये यांना प्रसन्न होऊन वर दिला, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे या देवस्थानाला 'श्री भवानीशंकर वरदेश्वर त्रिगुणात्मक मल्लिकार्जुन महादेव' असे नाव पडल्याचे मंदिरातील माहितीफलकावर नमूद आहे. कालांतराने हे देवस्थान श्री वरदेश्वर या नावाने प्रसिद्ध झाले.

**उभा नंदी खास वैशिष्ट्य**

शिवमंदिरांमध्ये नंदीची मूर्ती साधारणपणे बसलेल्या अवस्थेत पाहायला मिळते. मात्र गोरेगावच्या श्री वरदेश्वर मंदिरातील उभा नंदी हे येथील सर्वात वेगळे वैशिष्ट्य आहे. स्थानिक





आख्यायिकेनुसार, श्री भवानीशंकर मल्लिकार्जुन नंदीवर बसून या ठिकाणी आले. त्यांच्या आगमनावेळी नंदी उभा राहिला आणि त्यामुळेच येथील नंदी आजही उभ्या स्वरूपात असल्याची श्रद्धा आहे. या अनोख्या आख्यायिकेमुळे उभा नंदी भाविकांसाठी श्रद्धा आणि कुतूहलाचा विषय ठरला आहे.

**महाशिवरात्री उत्सवाची १०५ वर्षांची अखंड परंपरा**

श्री वरदेश्वर देवस्थानात महाशिवरात्री उत्सवाला विशेष महत्त्व आहे. गेल्या १०५ वर्षांपासून महाशिवरात्री उत्सव अखंडपणे साजरा केला जात असल्याचे सांगितले जाते. पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली ही धार्मिक परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने जपली जात आहे. महाशिवरात्रीच्या काळात गोरेगाव तसेच परिसरातील आणि दूरवरून येणारे भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित राहतात. पूजा-अर्चा, धार्मिक विधी आणि विविध कार्यक्रमांमुळे मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जातो.

**देवस्थान ट्रस्टकडून मंदिराच्या जतनाचे कार्य**

श्री देव वरदेश्वर देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून मंदिराची देखभाल तसेच धार्मिक आणि व्यवस्थापनाशी संबंधित विविध कामे केली जात आहेत. जुन्या देवळाच्या जीर्णोद्धाराचे कामही प्रगतीपथावर असून ते पूर्णत्वास आले आहे. मंदिराचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व जपत वास्तूचे संवर्धन करण्याचा प्रयत्न सुरू आहे.शेकडो वर्षांची श्रद्धा, परंपरा आणि स्थानिकांच्या धार्मिक भावनांशी जोडलेल्या या देवस्थानाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ट्रस्ट आणि भाविकांकडून प्रयत्न केले जात आहेत.

**जागृत देवस्थान, भाविकांची श्रद्धा**

स्थानिक भाविकांच्या श्रद्धेनुसार श्री वरदेश्वर महादेव हे जागृत देवस्थान आहे. श्रद्धेने येथे दर्शन घेणाऱ्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, अशी भावना भाविकांमध्ये आहे. श्रावण महिना, महाशिवरात्री तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या काळात मंदिरात मोठी गर्दी होते.

स्वयंभू श्री वरदेश्वर महादेव, तीन लिंगांची आख्यायिका, उभ्या नंदीमागील अनोखी कथा आणि १०५ वर्षांची महाशिवरात्री उत्सवाची अखंड परंपरा यामुळे गोरेगावचे हे देवस्थान धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

## पोलीस मित्र संघटनेच्या पत्राची दखल घेत खड्डे भरण्याच्या कामांना मंजुरी



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील रस्त्यांवर असलेल्या खड्ड्यांमुळे यावर्षी गणपती बाप्पाला घेऊन खड्ड्यात आंदोलन करण्याचा इशारा पोलीस मित्र संघटनेने दिला होता. पोलीस मित्र संघटनेच्या निवेदनाची रायगड जिल्हा परिषद कर्जत बांधकाम उप विभागाने दखल घेऊन कर्जत तालुक्यातील राजिप बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ११ खड्डेमय रस्ते दुरुस्तीसाठी १२ लक्ष रुपये तरतूद करण्यात आली आहे.

पोलीस मित्र संघटनेने राजिप बांधकाम विभागासह सर्व बांधकाम विभागाना गणपती उत्सव सुरू होण्यापूर्व सर्व रस्ते खड्डेमुक्त न केल्यास गणपती स्थापनेच्या दिवशी गणपती बाप्पाला मांडीवर घेऊन रस्त्यावरील खड्यात बसून उपोषण करण्याचा इशारा दिलेला आहे. पोलीस मित्र संघटना तालुक्यातील कोण कोणते बांधकाम विभाग गणपती उत्सव सुरू होण्यापूर्वी त्यांच्या अखत्यारीत असलेले रस्ते खड्डे मुक्त करते त्याकडे लक्ष लागून राहिले आहे. जे बांधकाम विभाग त्यांच्या अखत्यारीत असलेले रस्ते खड्डे मुक्त करणार नाही त्या बांधकाम विभागाच्या विरोधात त्यांच्या खड्डेमय रस्त्यावर गणपती बाप्पाला घेऊन रस्त्यावर बसून उपोषण करणार असल्याचे रमेश कदम यांनी सांगितले असून उपोषणाचा इशाराही देण्यात आला आहे.

संपूर्ण तालुक्यातील अनेक रस्ते खड्डेमय करण्यासाठी राजिप बांधकाम विभागाने फक्त १२ लक्ष नीधीची तरतूद केली आहे. ही तरतूद तुटपुंजी असुन राजिप बांधकाम विभाग तालुक्यातील त्यांच्या अखत्यारीत असलेले सर्व रस्ते खड्डे मुक्त करु शकत नाही. त्यामुळे राजिप बांधकाम विभाग कर्जतकर गोर गरीब मायबाप गणेश भक्तांची १२ लक्ष नीधीची तरतूद करुन थट्टा करील आहे. असे रमेश कदम यांच्याकडून सांगण्यात आले.

तसेच पोलीस मित्र संघटनेच्या निवेदनाची दखल घेऊन राजिप बांधकाम विभागाने रस्ते खड्डे मुक्त करण्यासाठी तुटपुंजी निधीची तरतूद करून का होईना, विचार करण्यात आला. अन्य बांधकाम विभागाच्या पुढे एक पाऊल टाकले आहे.

## मालकाच्या नंबरवरून अकाऊंटंटला मेसेज; पैसे ट्रान्सफर होताच सायबर भामट्यांचा डाव उघड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भोकरपाडा येथील एका रिअल इस्टेट व्यावसायिकाचे व्हॉट्सॲप अकाऊंट हॅक करून, त्याच क्रमांकावरून अकाऊंटंटला मेसेज पाठवत तब्बल १२ लाख रुपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायबर सेलच्या मदतीने तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार भोकरपाडा येथील व्यावसायिक मानस नानक पारवाणी हे रिअल इस्टेट व्यवसाय करतात. अज्ञात सायबर भामट्याने त्यांच्या मोबाईलमधील व्हॉट्सॲप अकाऊंटचा गैरवापर करत त्यांच्या अकाऊंटंट अनुराग दीक्षित यांना पारवाणी यांच्या क्रमांकावरून मेसेज पाठवला. या मेसेजमध्ये तातडीने १२ लाख रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करण्यास सांगण्यात आले.मेसेज पारवाणी यांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावरूनच आल्याने तो मालकानेच पाठविला असल्याचा समज झाल्याने अकाऊंटंट अनुराग दीक्षित यांनी कोणताही संशय न घेता सांगितलेल्या बँक खात्यात १२ लाख रुपये ऑनलाइन वर्ग केले.

दरम्यान, काही वेळाने मानस पारवाणी यांच्या बँक खात्यातून १२ लाख रुपये वजा झाल्याचा संदेश आल्यानंतर त्यांना धक्का बसला. त्यानंतर आपली ऑनलाइन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पारवाणी यांनी रसायनी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# वर्ल्डकपसाठी संघबांधणीला वेग

## गंभीर-गिलकडून खेळाडूंच्या पर्यायांची चाचपणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२८ स्पर्धेचा थरार दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबियात रंगणार आहे आहे. या स्पर्धेची सुरुवात ४ ऑक्टोबरपासून होणार आहे. वर्ल्डकपसाठी बीसीसीआयने संघबांधणी करायला सुरुवात केली आहे.



भारतीय संघाने याआधी २०११मध्ये झालेल्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत जेतेपदाचा मान मिळवला होता. त्यानंतर २०१५, २०१९ आणि २०२३मध्ये झालेल्या स्पर्धेत भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धेत शुबमन गिल भारतीय संघाचे नेतृत्व करताना दिसून येणार आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहली या स्पर्धेत खेळणार की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जातोय, पण दोघांचा सध्याचा फॉर्म पाहता, दोघेही आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धेत खेळताना दिसून येऊ शकतात.

या स्पर्धेत रोहित आणि गिलची जोडी डावाची सुरुवात करताना दिसू शकते, तर विराट कोहली नेहमीप्रमाणे तिसऱ्या क्रमांकावर खेळताना दिसून येऊ शकतो. त्यानंतर केएल राहुल आणि श्रेयस अय्यर खेळताना दिसू शकतात. टॉप ऑर्डरच्या फलंदाजांपैकी एखादा फलंदाज दुखापतग्रस्त झाला, तर त्याचा बॅकअप खेळाडू तयार आहे, पण मिडल ऑर्डरमध्ये असा एकही खेळाडू नाही, जो बॅकअप असू शकतो. ही समस्या दूर करण्यासाठी टीम मॅनेजमेंटने एक खास प्लॅन तयार केला आहे.

आगामी वर्ल्डकप स्पर्धेसाठी निवडकर्ते मिडल ऑर्डरच्या बॅकअप खेळाडूच्या शोधात आहेत. श्रेयस अय्यर अनेकदा दुखापतीमुळे संघाबाहेर असतो, त्यामुळे त्याचा बॅकअप म्हणून तिलक वर्माच्या नावाचा विचार केला जात आहे. सध्या तो टी-२० संघाचा उपकर्णधार आहे. त्याला फलंदाजीसह आपल्या गोलंदाजीवरही मेहनत घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### तिलक वर्माला मिळणार संधी?

टीम मॅनेजमेंट आणि निवडकर्ते तिलक वर्मावर लक्ष ठेवून आहेत. आगामी वनडे वर्ल्डकप स्पर्धेसाठी त्याला बॅकअप खेळाडू म्हणून संधी दिली जाऊ शकते. सध्या जो फलंदाजीक्रम आहे, त्यामध्ये टॉप ५ फलंदाज उजव्या हाताचे आहेत. त्यामुळे एक डावखुरा फलंदाज येणे भारतीय संघासाठी फायदेशीर ठरेल तसेच तिलक वर्मा फलंदाजीसह गोलंदाजीतही योगदान देऊ शकतो. त्यामुळे टीम इंडियासाठी गोलंदाजीचे पर्याय आणखी वाढणार आहेत.

# महापौर चषक कुस्ती स्पर्धा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रायगड जिल्हा मर्यादित महापौर चषक कुस्ती स्पर्धा अत्यंत उत्साहात आणि दिमाखात पार पडली. कळंबोली येथील नवीन सुधागड स्कूलच्या प्रांगणात या भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते आणि महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.



महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर यांच्या वतीने या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक कुस्ती खेळाला चालना देणाऱ्या या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आलेल्या मल्लांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपल्या कुस्ती कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन घडवले.

यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, रवींद्र भगत, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक रामदास शेवाळे, महादेव मधे, राजेंद्र शर्मा, अमर पाटील, शशिकांत शेळके, नगरसेविका दमयंती भोईर, प्रतिभा भोईर, प्रभुदास भोईर, राजा भोईर, रूपेश पावशे, प्रिन्स भोईर यांच्यासह विविध क्षेत्रांतील राजकीय व सामाजिक मान्यवरांनी उपस्थित राहून कुस्तीगिरांचा उत्साह वाढवला.



# ब्रावोची जर्सी झाली रिटायर!

## 'टीकेआर'कडून विशेष सन्मान

**किंगस्टन : वृत्तसंस्था**

टी-२० क्रिकेटमधील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू अशी छाप सोडणाऱ्या वेस्ट इंडिजच्या ड्वेन ब्रावोचा शाहरूख खानच्या सहमालकीच्या संघाने खास सन्मान केला आहे. कॅरेबियन प्रीमियर लीगमध्ये (सीपीएल) ट्रिनबागो नाइट रायडर्सने त्याच्या शानदार योगदानाची दखल घेत त्याची प्रसिद्ध ४७ क्रमांकाची जर्सी निवृत्त करण्याचा निर्णय घेतला आहे.

बीसीसीआयने सचिन तेंडुलकर आणि महेंद्रसिंह धोनीला ज्या प्रकारे सन्मान दिला, त्याच धर्तीवर 'टीकेआर'ने कॅरेबियन स्टार ब्रावोचा खास गौरव केला. सीपीएलच्या इतिहासात हा विशेष सन्मान मिळवणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. ब्रावोने खेळाडू म्हणून तब्बल पाच वेळा सीपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. याशिवाय ट्रिनबागो नाइट रायडर्सचा मुख्य प्रशिक्षक म्हणूनही त्याने एकदा विजेतेपद मिळवलेय.





**टीम आणि सीपीएलसाठी ड्वेन ब्रावोचे योगदान खूप मोठे आहे आणि ते केवळ शब्दांमध्ये किंवा आकडेवारीत मोजता येणार नाही. ब्रावोची ४७ क्रमांकाची जर्सी निवृत्त करून त्याच्या आठवणी आणि ओळख कायमस्वरूपी फ्रँचायझीसोबत जोडून ठेवण्याचा ट्रिनबागो नाइट रायडर्सचा प्रयत्न आहे.**
**-वेंकी मैसूर**, सीईओ, नाइट रायडर्स ग्रुप

# भारतीय गोलंदाजांच्या नो बॉलवर गावसकर भडकले!

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील कसोटी मालिका नुकतीच संपली असून भारताने या मालिकेत १-० असा विजय मिळवला. भारताने पहिला सामना जिंकला, तर दुसरा सामना श्रीलंकेने कडवी झुंज देत अनिर्णित राखला. यात भारताच्या गोलंदाजी विभागातील फिरकीपटूंच्या नो बॉलने सर्वांचे लक्ष वेधले. यादरम्यान वरिष्ठ खेळाडू रवींद्र जडेजाचे नो बॉल व त्याबाबत भारताच्या फिरकीपटू कोचने दिलेल्या वक्तव्यावर सुनील गावसकर संतापले आहेत.

गावसकर यांनी मिड-डेमधील आपल्या कॉलममध्ये लिहिले की, भारताच्या फिरकी गोलंदाजी प्रशिक्षकांनी मिश्कीलपणे नो-बॉलनंतर फ्री-हिट दिल्यास ही चूक कमी होऊ शकते, असे सुचवले, पण कृपया या शिक्षेच्या माध्यमातून कसोटी क्रिकेटमध्ये फलंदाजांसाठी धावा करणे आणखी सोपे करू नका. आधीच एका षटकात बाऊन्सरची संख्या दोनपर्यंत मर्यादित करण्यात आली आहे आणि सीमारेषाही जवळ आणण्यात आल्या आहेत. त्यामुळे धावा करणे थोडे सोपे झाले आहे.



### कोचलाही दंड करण्याची सूचना

नो-बॉलची जबाबदारी केवळ गोलंदाजांवर टाकण्याच्या बाजूने गावसकर नाहीत. गोलंदाजी प्रशिक्षकालाही गोलंदाजाला ठोठावलेल्या दंडाच्या निम्म्या रकमेचा दंड करावा, अशी त्यांनी सूचना केली आहे. गावसकर यांनी लिहिले, "त्याऐवजी प्रत्येक पुढील चुकीसाठी दंडाची रक्कम दुप्पट का करू नये? त्यासोबत गोलंदाजी प्रशिक्षकालाही त्या दंडाच्या निम्मी रक्कम द्यावी. या दंडातून जमा होणारी रक्कम खेळाडू संघ सोडण्यापूर्वी होणाऱ्या अखेरच्या टीम डिनरसाठी वापरता येईल."

"उदाहरणार्थ, थ्रो करताना बॅकअपला न जाणे किंवा मैदानावर एखादी गोष्ट योग्य पद्धतीने न करणे यासाठीही दंड असू शकतो. दंड द्यायचा की नाही यावर संपूर्ण संघ मतदान करू शकतो. हा एक मजेशीर उपक्रम ठरू शकतो आणि त्यामुळे संघातील खेळाडूंमधील नातेही अधिक घट्ट होऊ शकते," असे गावसकरांनी नमूद केले.

# महिला आशिया कपमध्ये ५ सप्टेंबरला भारत-पाक लढत

## 'नो हँडशेक'ची परंपरा कायम राहणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महिला टी-२० आशिया कप स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ एकाच गटात असून ५ सप्टेंबरला या दोन कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये हायव्होल्टेज सामना रंगणार आहे. आता या सामन्यापूर्वी दोन्ही संघांतील खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करणार का? हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

याआधीच्या आशिया कपपासून पुरुष संघापाठोपाठ भारतीय महिला संघानेही पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यांमध्ये नो हँडशेक भूमिका घेतली होती. त्यामुळे आशिया कपला सुरुवात होण्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत



भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांना पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करणार का, असा थेट प्रश्न विचारण्यात आला होता. यावर मुजुमदार यांनी संयमी भूमिका घेत थेट उत्तर देणे टाळले.

कोच मुझुमदार म्हणाले, आम्ही मैदानावर सर्वोत्तम क्रिकेट खेळण्यावर लक्ष केंद्रित करतो. मैदानाबाहेरील गोष्टींवर आम्ही लक्ष देत नाही. जेव्हा पाकिस्तानविरुद्धचा सामना येईल, तेव्हा त्याबाबत बोलू.

# ५१ वर्षांच्या महिला क्रिकेटपटूने मोडला ९६ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड

**बुखारेस्ट : वृत्तसंस्था**

५१ वर्षीय महिला क्रिकेटपटू जोआन हिक्स यांनी तब्बल ९६ वर्षांपूर्वीचा रेकॉर्ड मोडून काढला आहे. आईल ऑफ मॅनच्या या गोलंदाजाने पाच गडी बाद केले आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाच गडी बाद करणाऱ्या सर्वात वयस्कर गोलंदाजाचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.



विशेष म्हणजे हिक्स यांनी वयाच्या ४७व्या वर्षी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. या अनुभवी फिरकी गोलंदाजाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाच गडी बाद करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीदेखील तिने तीन वेळेस पाच गडी बाद करण्याचा कारनामा केला आहे. आता ग्रीसविरुद्ध खेळताना हिक्स यांनी अवघ्या १० धावा खर्च करून पाच गडी बाद केले. ही त्यांच्या टी-२० कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी आहे. या दमदार कामगिरीच्या बळावर ग्रीसचा डाव १५ षटकात अवघ्या ५२ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या आईल ऑफ मॅन संघाने दिलेले आव्हान नऊ गडी राखून पूर्ण केले आणि एकतर्फी विजयाची नोंद केली.

जोआन हिक्सने ९६ वर्षांपूर्वीचा मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे. पुरुष आणि महिलांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये वयाची पन्नाशी ओलांडल्यानंतर पाच गडी बाद करणारी ती पहिलीच गोलंदाज ठरली आहे. याआधी १९३२मध्ये ऑस्ट्रेलियाच्या बर्ट आयरनमोंगर यांनी द. आफ्रिकेविरुद्ध वयाच्या ५२व्या वर्षी गोलंदाजी करताना हा कारनामा केला होता.

# पनवेलमध्ये महापौर चषक कॅरम व बुद्धिबळ स्पर्धा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलला भविष्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा नगरी बनवण्याचा आमचा ध्यास आहे, असे प्रतिपादन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी केले. अभिनव युवक मित्र मंडळ, अभिनव स्वर गर्जना ढोल-ताशा पथक, नादस्फूर्ती ढोल-ताशा पथक व विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या महापौर चषक पनवेल ओपन कॅरम व बुद्धिबळ स्पर्धेवेळी ते बोलत होते.

या स्पर्धेला भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले. उपक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंशी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांचा उत्साह वाढवला. क्रीडा संस्कृतीला चालना देणारे आणि युवा खेळाडूंना प्रोत्साहन देणारे असे भव्य उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, अभिषेक पटवर्धन, राजेश गायकर, आयोजक सचिन तुपे, डी.आर. भोईर यांच्यासह परिसरातील नागरिक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आशिया कपमध्ये श्रीलंकेचा यूएईवर दणदणीत विजय

**दुबई : वृत्तसंस्था**

महिला आशिया कप स्पर्धेत श्रीलंकेच्या संघाने शानदार सुरुवात करत संयुक्त अरब अमिरातीचा (यूएई) नऊ गडी राखून पराभव केला. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या गट फेरीच्या सामन्यात यूएईने दिलेले ८० धावांचे लक्ष्य श्रीलंकेने अवघ्या ७.५ षटकांत एका गड्याच्या मोबदल्यात गाठले.

नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या यूएईचा डाव श्रीलंकेच्या गोलंदाजांसमोर फारसा टिकला नाही. संपूर्ण संघ १९.५ षटकांत ७९ धावांवर सर्वबाद झाला. यूएईकडून कर्णधार ईशा ओझाने सर्वाधिक १८ धावा केल्या. तिच्या खेळीत दोन चौकारांचा समावेश होता. श्रीलंकेकडून मिताली अयोध्याने ३.५ षटकांत १४ धावा देत तीन बळी घेतले, तर चेतना विमुक्तीने चार षटकांत १६ धावा देत तीन विकेट्स मिळवल्या. सुगंधिका कुमारीने दोन विकेट्स घेतल्या.



यूएईने सुरुवातीलाच तीर्था सतीशला शून्यावर गमावले. त्यानंतर लावण्या केनीही केवळ तीन धावांवर बाद झाली. कर्णधार ईशा ओझाने हिना होच्चंदानीसोबत तिसऱ्या विकेटसाठी १९ धावांची भागीदारी करत डाव सावरण्याचा प्रयत्न केला. हिना होच्चंदानीने १० धावा केल्या. समायरा धरनिधारकाने १७ धावांचे योगदान दिले. रिनिथा रजिथाने १५ धावा करत संघाला काही प्रमाणात सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र श्रीलंकेच्या अचूक गोलंदाजीसमोर यूएईचा संपूर्ण संघ ७९ धावांवर गारद झाला.

८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने सुरुवातीपासूनच आक्रमक फलंदाजी केली. इमेशा दुलानी आणि कर्णधार चमारी अटापट्टू यांनी पहिल्या विकेटसाठी अवघ्या ३५ चेंडूंमध्ये ५७ धावांची भागीदारी केली. इमेशा दुलानीने १८ चेंडूंमध्ये २५ धावांची खेळी केली. ती धावबाद झाल्यानंतर अटापट्टूने संजना कविंदीसोबत दुसऱ्या विकेटसाठी १२ चेंडूंमध्ये नाबाद २३ धावांची भागीदारी करत संघाला विजय मिळवून दिला.

कर्णधार चमारी अटापट्टूने अवघ्या २५ चेंडूंमध्ये नाबाद ४८ धावांची धडाकेबाज खेळी केली. तिच्या खेळीत तब्बल सात चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. संजना कविंदी पाच धावांवर नाबाद राहिली. श्रीलंकेने ७.५ षटकांत ८० धावा करत सामना आपल्या नावावर केला. विशेष म्हणजे यूएईच्या एकाही गोलंदाजाला विकेट मिळवता आली नाही.

पाचवा पुण्यस्मरण सोहळा

*उडाली पक्षिणी गेली अंतराळी।*
*चित्त बाळाजवळी ठेवोनिया।।*



**कै. सुनंदा विश्वनाथ कोळी**
**यांचा पाचवा पुण्यस्मरण दिन सोहळा**
**श्रावण कृ.३ सोमवार, दिनांक ३१/८/२०२६ रोजी करण्यात येत आहे.**
**ठिकाण - मु. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**
**कृपया आपणा सर्वांना कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com